
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष एकविसावे / अंक ९ / सप्टेंबर २०२०

## संपादकीय

### करोनोत्तर उच्च शिक्षण

शिक्षण ही व्यक्तीची मूलभूत गरज. शिक्षणाने माणूस प्रगल्भ चिंतनशील व सुजाण नागरिक बनतो. भारताच्या प्राचीन ते अर्वाचीन इतिहासामध्ये शिक्षणाला अत्यंत मोलाचे स्थान देण्यात आले आहे. 'सा विद्या या विमुक्तये' असं वचन प्रसिद्ध आहे. याचा अर्थ 'विद्या ती, जी माणसाला मुक्त करते'. व्यक्तीला डोळसपणे जगाकडे पाहता यावे व विवेकाधिष्ठीत समाज निर्माण व्हावा हे विद्येचं मूलगामी लक्षण आहे. आपल्या परंपरेने 'परा विद्या' व 'अपरा विद्या' अशीदेखील मांडणी केली आहे.

लौकिक शिक्षणाचा विचार करता व्यक्तीला अक्षर ओळख, प्राथमिक अंकज्ञान, तसेच उपजीविका करण्यासाठी लागणारे कौशल्य, असा शिक्षणाचा सध्याचा विचार आपणास पहावयास मिळतो. त्यात 'जीविका' व 'उपजीविका' असे दोन भाग आहेत. शिक्षणाने माणसाला उपजीविका व जीविका या दोन्ही गोष्टी मिळाव्या असे अभिप्रेत आहे. मात्र सद्य प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये त्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

टिळकांनी, 'खरे विद्यापीठ कोणते?' या शीर्षकाचा २५ फेब्रुवारी १८९६ रोजी एक अग्रलेख 'केसरी'मध्ये लिहिला. या लेखामध्ये भारतात पन्नास वर्षांपासून सुरू असलेल्या इंग्रजी शिक्षणाच्या फलश्रुतीवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. टिळकांच्या मते इंग्रज सरकारने लादलेले हे शिक्षण विशिष्ट दिशेने फलद्रूप होत नाही हे पाहून त्यांची फार निराशा झाली. टिळक लिहितात, 'नेमके जे घडायला पाहिजे ते घडत नाही असे दिसून आले. दुधाने ज्याप्रमाणे ताकाचे अनुकरण करावे त्याप्रमाणे युरोपियन विद्यापीठाचे आमच्या देशातील विद्यापीठे हे अनुकरण होय. या संस्था कशा असाव्यात तशा नसल्यामुळे कोणत्याही शास्त्राचा शोधक बुद्धीने आस्थापूर्वक अभ्यास करणारे गृहस्थ अलीकडे पैदा होत नाहीत. नवीन शोध करण्याइतकी बुद्धी अथवा योग्यता आमच्या अंगात नाही असे नाही. ज्या देशात पाणिनी, कणाद, शंकराचार्य, भास्कराचार्य वगैरे विद्वान पूर्वकाली होऊन गेले त्यात सध्या लुई पाश्चर, एडिसन, मिल वगैरे ग्रहस्थांप्रमाणे विद्वान का निपजू नयेत याचे खरे कारण शोधून काढून त्याचा प्रतिकार करणे हे प्रत्येक विद्या बुद्धी इच्छिणाऱ्यांचे कर्तव्य आहे. सुधारलेल्या देशात विद्यापीठांची व्यवस्था गुरूंकडे असते. आयुष्य हे अध्ययन

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

व अध्यापन यात ते घालवितात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे खरे गुण–दोष अथवा अडचणी त्यांना समजून येतात. गुरूंच्या विद्या–अभ्यासाचा आणि सद्वर्तनाचा परिणाम त्यांच्या मनावर होण्यास गुरुजी खरोखर विद्या–व्यसनी असून, छात्रवासी वर्गाशी प्रेमभावाने वागणारे असले पाहिजेत. पण तसला प्रकार आमच्याकडे नाही. मुंबई विद्यापीठ १८५७ साली स्थापन झाले, पण तेव्हापासून या संस्थेतून एकही जगप्रसिद्ध विद्वान निघू नये हे आश्चर्य नव्हे काय? तेलंग, रानडे, भांडारकर वगैरे काही विद्वान यापूर्वी निघाले आहेत. पण त्यापैकी काही इतर धंद्यात शिरल्यामुळे शास्त्र अभ्यासाच्या कामी त्यांचा जसा उपयोग व्हावा तसा झालेला नाही. तरी ते कायद्याच्या अभ्यासांत गढून गेले आहेत. पण त्याचा उपयोग काय? ज्याने समरांगणी अश्वारूढ होऊन दोन हात करावयाचे, त्यांनी आपले कौशल्य घरात बायकोच्या नथीतून तीर मारण्यात खर्च करावे, तसा प्रस्तुतचा प्रकार आहे. आमच्या विद्यापीठात खरे विद्याव्यासंगी गुरू नाहीत. पदव्यांचे शिक्के ठोकण्यापलीकडे काही काम चालत नाही. विद्यापीठ परीक्षा घेणारी रजिस्टर्ड कंपनी झाली आहे असे म्हटले तरी चालेल.'

टिळकांनी वरील लेखात जो संदर्भ दिला आहे त्यातून इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांचे कुठलेही मूलगामी उत्थान झाले नाही. मात्र भारतीय विचार–परंपरेने दिलेले साक्षेपी विचार नष्ट होऊन, केवळ पोपटपंची करणारा व खर्डेघाशी करून इंग्रज सरकारला कारकुनी करण्यात मदत करणारा वर्ग प्रचलित शिक्षण व्यवस्थेत निर्माण होत होता याचा टिळकांनी खेद व्यक्त केला आहे. आज २०२० मध्ये देखील टिळकांनी विद्यापीठाला, 'परीक्षा घेणारी रजिस्टर्ड कंपनी' असे म्हटले आहे ते रास्त वाटते. टिळकांनीही केसरीमध्ये मांडलेले विचार हे ते इंग्रजांनी लादलेल्या शिक्षणाबद्दल होते. मात्र भारत स्वातंत्र्य झाल्यापासून जे शिक्षण सध्या भारतात प्रचलित आहे त्या शिक्षणाकडे पाहून देखील मागच्या शंभर वर्षांत कुठलाही बदल झाला नाही असेच वाटते.

योगी अरविंद यांच्या शिक्षण–संकल्पनेकडे पाहिले तर त्यांच्या मते 'कुठलीही गोष्ट शिकवता येणे शक्य नाही. मात्र प्रत्येक गोष्ट शिकता येणे शक्य आहे' असे ते म्हणतात. करोनाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर  शाळा व महाविद्यालये सुरू झाल्यानंतर सर्वांनाच आलेला हा अनुभव आहे की, कितीतरी विद्यार्थी व प्राध्यापकांनी स्वतःहून यूट्युब इंटरनेट इत्यादी माध्यमांतून अनेक गोष्टी स्वतःहून शिकण्याचा प्रयोग केला व तो यशस्वी देखील झाला. याचा अर्थ शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत नसून तो विद्यार्थ्यांच्या मनामध्ये शिकण्याची व त्याच्या शिक्षण क्षमतेची जाणीव करून त्याला शिक्षणास उद्युक्त करतो. 'भारतीय शिक्षण विचार' हा समोरच्या व्यक्तीमध्ये असलेल्या ईश्वरी तत्त्वाला फुंकर घालून त्यातील 'स्वत्व' जागा करणारा आहे असे स्वामी विवेकानंदांचे देखील मत होते. 'व्यक्तींमध्ये असलेल्या परमोच्च दैवी गुणांचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण होय' असे विवेकानंद म्हणत असत. या सर्व वैचारिक पृष्ठभूमीची चर्चा करण्याचे कारण म्हणजे; कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर उच्च शिक्षणामध्ये होऊ घातलेले जे बदल आपण पाहत आहोत त्या बदलांना सैद्धांतिक पार्श्वभूमी देण्यासाठी स्व–शिक्षण महत्त्वाचे आहे असे नमूद करावेसे वाटते. योगी अरविंद, विनोबा भावे, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक इत्यादी क्रांतदर्शी व्यक्तींनी

(पृष्ठ क्र.३९ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

## वर्ष एकविसावे/अंक ९/सप्टेंबर २०२०


**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २५ वे/अंक ३ रा)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी | |
| २) | ज्ञानप्राप्तीची विविध ठिकाणे | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | मिखाईल गोर्बाचेव व साम्यवादी सोविएत संघाचे विघटन | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ७ |
| ४) | डॉ. शेखर बसू : अणुइंधन पुनर्चक्रण पूर्णत्वास नेणारे अणुशास्त्रज्ञ | श्री. नरेंद्र गोळे | १२ |
| ५) | देशोदेशींचे लॉकडाऊन | अपर्णा कुलकर्णी | १५ |
| ६) | शिक्षण व शिक्षकांचे बदलते स्वरूप | सौ. सविता ज. धर्माधिकारी | १७ |
| ७) | ओळख वनस्पतींची : घाणेरा/नरक्या | श्री. प्रकाश दुधाळकर | १९ |
| ८) | गजेंद्र अहिरे दिग्दर्शित चित्रपट 'पोस्टकार्ड' : एक रसग्रहण | प्रा. श्रीपाद जोशी | २१ |
| ९) | संगीत मनमोही रे भाग ३:'राग जाती आणि राग वेग' | डॉ. कीर्ती आगाशे | २३ |
| १०) | आ बैल मुझे मार युरोपातील मुस्लिम स्थलांतरीत | डॉ. प्रमोद पाठक | २५ |
| ११) | 'मुहम्मद-अल-अमिली : एका अरबी कविची गोष्ट' | श्री. संकेत कुलकर्णी | ३२ |
| १२) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. ‘दिशा’च्या संदर्भात

- आपण ‘दिशा’ नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून ‘दिशा’ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर ‘दिशा’चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# ज्ञानप्राप्तीची विविध ठिकाणे

*विद्यार्थी शाळेखेरीज अनेक ठिकाणांहून ज्ञान मिळवित असतात. त्यातील काही महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती या लेखात दिलेली आहे - संपादक*

शिक्षणाचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा आपण प्रमुख्याने शाळेच्या चार भिंतीत दिल्या जाणाऱ्या औपचारिक शिक्षणावर आपले लक्ष केंद्रित करतो. विद्यार्थ्यांना अनेक मार्गाने ज्ञानप्राप्ती होत असते. त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात अनेक घटक कार्य करीत असतात. घर, शैक्षणिक संस्था, समाज हे तीन प्रमुख घटक आहेत. त्याचबरोबर आजूबाजूला असलेल्या सुविधा, उद्बोधनाच्या संधी, समाजात आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धा या बाबी देखील तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. काही वर्षांपूर्वी दोन ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञांनी लिहिलेले एक संशोधनपर पुस्तक माझ्या वाचनात आले. पुस्तकाचे नाव '१५००० तास' (Fifteen Thousand Hours) असे होते. मूल शाळेत जायला लागल्यापासून माध्यमिक शिक्षण पूर्ण करेपर्यंत साधारणपणे पंधरा हजार तास शाळेत राहते. या कालावधीचा त्याच्या व्यक्तीत्वावर फारसा प्रभाव प्रभाव पडत नाही. याउलट घरातील वातावरण, समाजातील चालीरीती, आई-वडिलांचे वागणे या बाबींचे परिणाम जास्त दूरगामी असतात असा त्यांनी निष्कर्ष काढला होता. दिवसाचे साधारणपणे सहा तास मूल शाळेत असते. बाकीच्या वेळेत हे मूल आजूबाजूच्या घटनांचे निरीक्षण करते, संपर्कात येणाऱ्या लोकांशी आंतरक्रिया करते, घरात उपलब्ध असलेली पुस्तके वाचते, जवळच्या स्थळांना भेटी देते. या सगळ्या बाबी मुलांच्या जडणघडणीत महत्त्वाचे काम करतात. मुलाला चांगल्या शाळेत घातले किंवा महागड्या शिकवणी वर्गात घातले की आपली जबाबदारी संपली असे बरेच पालकांना वाटते! हा विचार चुकीचा आहे. शालाबाह्य शैक्षणिक संधी मुलांना उपलब्ध करून देणे हे पालकांचे तसेच समाजाचे कार्य आहे. प्रगत देशांमध्ये या बाबींकडे पुरेसे लक्ष दिल्याचे जाणवते. त्यातील काही बाबींची या लेखात चर्चा केलेली आहे.

**१. वाचनालये**

वाचनालय हे ज्ञानाचे भांडार आहे. येथे अनेक विषयांवर आणि अनेक लेखकांनी लिहिलेली पुस्तके उपलब्ध असतात. शाळा आणि महाविद्यालये यांची स्वत:ची वाचनालये असतात. परंतु त्यांच्या विस्तार करण्यावर मर्यादा येतात. शैक्षणिक संस्थांना शासनाकडून वाचनालयासाठी जो निधी मिळतो त्याचा उपयोग ते प्रामुख्याने अभ्यासक्रमाशी संबंधित आणि अभ्यासपूरक साहित्य खरेदी करण्यासाठी वापरतात. अवांतर विषयावर लिहिलेले साहित्य हवे असेल तर आपल्याला सार्वजनिक वाचनालयाची मदत घ्यावी लागते. आपल्यापैकी बऱ्याच जणांना लेखन आणि वाचन या बाबतीत जो रस निर्माण झाला तो या सार्वजनिक वाचनालयांतूच झाला आहे.

सार्वजनिक वाचनालये विविध वयोगटातील लोकांना उपयोगी पडतील या दृष्टीने विकसित केलेली असतात. ही वाचनालये विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करतीलच अशी खात्री मात्र देता येत नाही. त्यासाठी मुलांची वेगळी वाचनालये निर्माण करावी लागतात. दोन दशकांपूर्वी मला रशियाला जाण्याची संधी मिळाली. तेव्हा मला असे कळले की, मॉस्को शहरात मुलांसाठी विकसित केलेले एक स्वतंत्र वाचनालय आहे. १९६९ साली स्थापन झालेल्या या वाचनालयाचे नाव 'रशियन

स्टेट चिल्ड्रेन्स लायब्ररी' (Russian State Children's Library) असे आहे. मुलांना रुचतील अशा विषयांची पुस्तके येथे आहेत. सध्या संगणकाचे युग आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ज्ञान कसे मिळविता येते हे समण्यासाठी वाचनालयात एक वेगळे दालन तेथे आहे. मुलांना बसण्यासाठी योग्य व्यवस्था केली आहे. तेथील साहित्य मुले घरी घेऊन जाऊ शकतात.



**मॉस्को येथील मुलांचे वाचनालय**

## २. वस्तू संग्रहालये

वस्तू संग्रहालय हे एक असे ठिकाण आहे जेथे अनेक प्रकारची माहिती एकाच ठिकाणी मिळते. उत्खननात सापडलेल्या अनेक वस्तू आपल्याला तेथे पाहायला मिळतात. विविध कालखंडात मानवाने बनविलेल्या वस्तूंचे तिथे दर्शन होते. धातू, लोखंड, दगड यांचा वापर करून किती वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू बनविता येतात याची प्रत्यक्ष माहिती आपल्याला मिळते. त्यामुळे वस्तूसंग्रहालयाला भेट देणे हा एक ज्ञानवर्धक अनुभव असतो.

माझ्या कामाच्या निमित्ताने मला अनेकदा विदेशात जाण्याची संधी मिळाली. तरीही पहिल्या परदेश प्रवासाचे कौतुक काही औरच असते. मी पहिल्यांदा भेट दिलेला देश हा डेन्मार्क होय. एका शिक्षण परिषदेच्या निमित्ताने मला कोपेनहेगनला पाचारण करण्यात आले. तेथे पोहोचल्यावर शहरात पाहण्यासारखी ठिकाणे कोणती अशी मी चौकशी केली तेव्हा मला सांगण्यात आले की, मी डॅनिश नॅशनल म्युझियम बघावे. त्यानुसार वेळ काढून मी ते संग्रहालय पाहायला गेलो. अनेक वस्तूंनी युक्त असे हे संग्रहालय पाहून मी तर भारावूनच गेलो. विशेष म्हणजे तेथे शाळकरी मुले मोठ्या संख्येने होती.



**डॅनिश नॅशनल म्युझियम मधील एक दालन**

## ३. विज्ञान केंद्र

विज्ञानाने जगात क्रांती घडवून आणली आहे. औद्योगिक क्रांतीचे मूळ खरे तर वैज्ञानिक प्रगतीतच आहे. त्यामुळे त्यांची माहिती विद्यार्थी दशेतच होणे आवश्यक आहे. या दृष्टीने विचार करून वेगवेगळ्या देशात विज्ञान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. युरोपातल्या प्रत्येक मोठ्या शहरात एक विज्ञान केंद्र आपल्याला आढळतेच. बर्मिंगहॅम शहरात थिंक टँक नावाचे एक विज्ञान केंद्र आहे. तेथे विज्ञानाचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ असे तीन विभाग आहेत.

प्रगत देशाबरोबरच प्रगतीशील देशांनी देखील या बाबीकडे पुरेसे लक्ष दिल्याचे आढळते. चीन या आपल्या शेजारच्या देशाने अलीकडच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानात नेत्रदीपक अशी प्रगती केलेली आहे. माझ्या एका चीन भेटीत मला शांघाय शहरातील विज्ञान तंत्रज्ञान

केंद्र पाहण्याची संधी मिळाली. त्यात अनेक महत्त्वाची दालने आहेत. त्यातील एका दालनाचे चित्र खाली देत आहे.



**विज्ञान केंद्रातील एक महाकाय सांगाडा**

प्रा. सरोज घोष यांनी पुढाकार घेऊन भारताच्या काही शहरांत विज्ञान केंद्रे उभारली आहेत. या केंद्रात अनेक मनोरंजक प्रयोग विद्यार्थ्यांना स्वत: करून पाहता येतात. त्याचबरोबर तेथे बऱ्याचदा निबंध स्पर्धा, किंवा विज्ञान नावीन्य स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याचा विद्यार्थ्यांना खूप फायदा होतो. परंतु लोकसंख्येचा विचार करता आपल्या देशात विज्ञान केंद्राची संख्या फारच मर्यादित आहे. महाराष्ट्र या प्रगत राज्याचा जरी विचार केला तरी आपल्या लक्षात येते की, संपूर्ण राज्यात बोटावर मोजण्याएवढीच विज्ञान केंद्रे आहेत. तेही मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर अशा मोठ्या शहरांतच आहेत. आमचे बहुसंख्य विद्यार्थी खेड्यात आणि लहान शहरांत राहतात. त्यांना अशा केंद्रांना भेट देणे अशक्य होते. त्यासाठी जिल्हा स्तरावर विज्ञान केंद्रे स्थापन करण्याची गरज आहे.

**४. मानव संग्रहालये**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे विविध समाजातील लोक राहतात. प्रत्येक समाजाचे राहणीमान, खाण्यापिण्याच्या सवयी, कपडेलत्ते यामध्ये खूप विविधता आढळते. त्याची माहिती आपल्या विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. यासाठी विशिष्ट प्रकारच्या संग्रहालयांची गरज असते. असा प्रयत्न मध्य प्रदेश सरकारने केला आहे. काही वर्षांपूर्वी मध्य प्रदेश राज्याची राजधानी भोपाळ येथे मी गेलो होतो. तेथे मला मानव संग्रहालय पाहायला मिळाले. एका पठारावर विस्तीर्ण अशा परिसरात हे संग्रहालय उभारण्यात आले आहे. वेगवेगळ्या झोपड्या बांधून प्रत्येक आदिवासी गटाची सविस्तर माहिति तिथे दिली आहे. ती फारच उद्बोधक अशी आहे. त्याचबरोबर तेथे एक बंदिस्त संग्रहालय देखील आहे. तेथे अनेक वस्तू ठेवलेल्या असून त्यांची चांगली माहिति दिलेली आहे.



**मानव संग्रहालयातील एक झोपडी**

महाराष्ट्रात देखील अनेक गटांतील लोक राहतात. परंतु मानव संग्रहालय महाराष्ट्र राज्यात कुठेही नाही. गोंडवन, सातपुडा, कोंकण या परिसरात राहणाऱ्या आदिवासी बांधवांची आमच्या शहरी मुलांना काहीच माहिति मिळत नाही. त्यामुळे बोलपटात जे पाहतात त्यावरच त्यांना विश्वास ठेवावा लागतो.

**५. वनस्पती उद्याने**

आपल्या आजूबाजूला अनेक वनस्पती असतात. त्याचबरोबर वेगवेगळ्या वातावरणात आणि वेगवेगळ्या

भौगोलिक परिस्थितीत विविध वनस्पती वाढतात. त्या एकत्रितपणे पाहण्याचे ठिकाण म्हणजे वनस्पती उद्याने होत. अशी उद्याने आपल्याकडे फारशी नाहीत. परंतु प्रगत देशात ठरवून अशी उद्याने विकसित करण्यात आलेली आहेत. उदाहरणच द्यायचे झाले तर ऑक्सफर्डच्या वनस्पती उद्यानाचे देता येईल. शंभर वर्षांहून जास्त जुने असलेले हे उद्यान आहे. यात जगातल्या अनेक वनस्पती जपून ठेवल्या आहेत. जेव्हा आम्ही भारतीय विद्यार्थ्यांना इंग्लंडला सहलीला घेऊन जातो तेव्हा त्यांना हे उद्यान न विसरता दाखवितो.



**वनस्पती उद्यानातील कॅक्टसची झाडे**

पर्यटन स्थळे हे देखील ज्ञानदानाची ठिकाणे आहेत. या स्थळांचा प्रभावी उपयोग नॅशनल जिऑग्राफिक या दूरचित्रवाणी वाहिनीने फारच प्रभावीपणे करून घेतलेला आहे. खरे तर त्याची सुरुवात अमेरिकेतील भूगोल शिकविणाऱ्या तीन शिक्षकांनी केली. वेगवेगळ्या ठिकाणांना भेटी देऊन तेथील छायाचित्रे ते गोळा करीत असत. त्यांचा उपयोग करून त्यानी नॅशनल जिऑग्राफिक नावाचे मासिक सुरू केले. दूरचित्रवाणीचा प्रसार झाल्यावर त्याच नावाने वाहिनी सुरू करण्यात आली. दूरचित्रवाणी हे ज्ञानदानाचे एक प्रभावी माध्यम आहे. आम्ही मात्र या माध्यमाचा केवळ मनोरंजनासाठी उपयोग करून घेत आहोत. हे माध्यम ज्ञानप्रसाराचे प्रभावी साधन कसे बनेल याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

सध्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची चर्चा सर्वत्र चालू आहे. भारतीय लोकसभेने २९ जुलै रोजी या मसुद्याला मंजुरी देखील दिली. या नवीन धोरणाची काय वैशिष्ट्ये आहेत आणि त्याची अंमलबजावणी कशी करावी या दृष्टीने देशभर सभा संमेलने आयोजित करण्यात येत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणात अनेक नवीन बाबी आहेत. तथापि सगळा भर हा चार भिंतींच्या आत दिल्या जाणाऱ्या औपचारिक शिक्षणावरच आहे. शालाबाह्य शिक्षणाची पुरेसी दखल या दस्तावेजात घेतलेली नाही असे मला वाटते. पालकांनी आणि समाजाने जर नवनिर्मितीला प्रोत्साहन दिले नाही तर आपली मुले संशोधनाकडे कशी वळतील? नवनिर्मिती जर झाली नाही तर आत्मनिर्भर भारताचे स्वप्न कसे पूर्ण होईल? हे विषय शांतपणे विचार करण्याचे आहेत.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई,
ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

•••

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

चुका करणे हा माणसाचा, परंतु क्षमा करणे हा ईश्वराचा गुणधर्म आहे.

# मिखाईल गोर्बाचेव व साम्यवादी सोविएत संघाचे विघटन

*१९९१ या वर्षात सोविएत संघ या देशाचे विघटन झाले व तेथील साम्यवादी राजवट संपुष्टात आली या घटनेचा ऐतिहासिक मागोवा घेणारा लेख - संपादक*

१९९१ पर्यंत सोविएत संघ नामक विशाल वा क्षेत्रफळाने अतिशय मोठा, नव्हे जगात सर्वात मोठा देश पृथ्वीच्या नकाशावर दिसत असे. परंतु १९९१ साली सोविएत संघाचे विघटन झाले व हा देश इतिहासजमा झाला. सोविएत संघ हा देश युनियन ऑफ सोविएत सोशलिस्ट रशिया या नावाने देखील ओळखला जात असे. सोविएत संघात साम्यवादी राजवट अस्तित्वात होती. याचाच अर्थ असा की, तेथील साम्यवादी पक्षाची राजवट म्हणजेच हुकूमशाही होती. १९९१ साली सोविएत संघाचे विघटनच झाले नाही तर तेथील साम्यवादी राजवट देखील संपुष्टात झाली. हा देश ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीनंतर साम्यवादी राजवटीचा स्वीकार करणारा पहिला देश ठरला होता. १९१७ पासून १९९१ पर्यंत लेनीन, स्टॅलिन, ख्रुश्चेव, ब्रेझनेव व गोर्बाचेव या नेत्यांनी या देशाची राजकीय धुरा सांभाळली होती.

ऑक्टोबर १९१७ ची साम्यवादी क्रांती जरी लेनिनच्या नेतृत्वाखाली झाली असली तरी रशियात (नंतरच्या सोविएत संघात) खऱ्या अर्थाने साम्यवादाची घडी बसविण्याअगोदरच १९२४ मध्ये त्याचे निधन झाले. लेनिननंतर स्टॅलिन सत्तेवर आला. स्टॅलिनने साम्यवादाचा आपल्यापरीने वेगळा अर्थ लावला. अनेक तज्ज्ञांचे असे मत आहे की, लेनिन व स्टॅलिन यांच्या नीती-धोरणांमध्ये जमीन अस्मानाचा फरक होता. असे म्हटले जाते की, लेनिनला मनापासून स्टॅलिनच्या हातात सत्ता जावी असे वाटत नव्हते. परंतु नियतीला वेगळेच काही मान्य होते. त्यामुळे लेनीनच्या मृत्यूनंतर स्टॅलिनने पद्धतशीरपणे आपल्या विरोधकांचा काटा काढून स्वतःच्या हातात सोविएत संघाची पूर्ण सत्ता घेतली. स्टॅलिनच्या कार्यकाळात आपल्या विरोधकांना कठोर शिक्षा करणे व त्यांना मृत्यूदंड देणे हा जणूकाही नियमच बनला होता. त्याने राजकीय व आर्थिक बाबतीत सर्व सत्ता स्वतःच्या हातात एकवटेल असे धोरण राबवले होते. अर्थव्यवस्थेवर साम्यवादी सरकारची मजबूत पकड व नियंत्रण होते. स्टॅलिनने पूर्व युरोपातील साम्यवादी देशांना देखील कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य दिले नव्हते. या देशांना सोविएत संघाने दिलेल्या आदेशांचे पालन करणे क्रमप्राप्त होते.

१९५३ मध्ये स्टॅलिनचा मृत्यू झाला. त्यानंतर काही कालावधीत ख्रुश्चेवच्या हाती खऱ्या अर्थाने सोविएत संघाची सत्ता आली. ख्रुश्चेवने स्टॅलिनच्या बऱ्याच धोरणांमध्ये बदल करण्याचा सपाटा लावला. एवढेच नव्हे तर, त्याने स्टॅलिनवर देखील टिकास्त्र सोडले. ख्रुश्चेव हा बऱ्याच अंशी उदारमतवादी नेता होता व त्याला सोवियत संघात बरेच सकारात्मक बदल घडवून आणायचे होते. त्याप्रमाणे त्याने प्रयत्नदेखील केलेले दिसतात. परंतु त्याचे काही प्रयत्न व धोरणं यशस्वी तर काही अपयशी ठरली. १९६४ या वर्षात ख्रुश्चेवला देखील सत्तेवरून हटवण्यात आले व सुरुवातीच्या काळात कोसिजिन, ब्रेझनेव व पॉडगॉर्नी या तिघांनी सत्ता आपल्या हातात घेतली. परंतु १९७७ पर्यंत ब्रेझनेवला आपल्या सहकाऱ्यांना हटवून सर्व सत्ता स्वतःच्या हातात घेण्यात यश आले.

ब्रेझनेवच्या काळात देशांतर्गत व आर्थिक बाबतीत मोठे बदल घडले नाहीत असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्याने सत्तेचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण केले. ब्रेझनेव साधारणतः १९७७ ते १९८२ या काळात सोविएत संघात सत्ताधीश होता. या काळात संघाची अर्थव्यवस्था घरघरीला लागली असे म्हणणे सयुक्तिक ठरेल. अनेक उद्योगांमध्ये गोंधळ माजलेला होता. आर्थिक धोरणे केंद्रीय सत्तेकडून ठरवली जात. सोविएत संघातील विविध कारखान्यांचे मंत्री की तंत्रज्ञान झालेले होते. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे व उत्पादन वाढवणे ही काळाची गरज होती. परंतु ब्रेझनव युगात असे काही बदल करण्यात आले नाहीत. कोळसा व तेल उद्योगातील उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटले होते. बांधकाम उद्योगातील प्रत घसरलेली होती. सोविएत संघातील कृषी क्षेत्र तर कायम संकटात असे. त्यामुळे ज्या अमेरिकेला विरोध केला जाई तिच्याकडूनच गहू आयात करण्याची नामुष्की येत असे. सोविएत संघाच्या तुलनेत अमेरिकेतील कृषीक्षेत्र व शेती उद्योग मोठ्या प्रमाणात प्रगत होते व उत्पादन देखील विक्रमी होत असे. ब्रेझनेवने पूर्व युरोपातील साम्यवादी देशांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण व सोविएत संघाची पकड ठेवण्याच्या धोरणाचे अनुकरण केले. झेकोस्लोवाकियात लष्कर धाडण्यात आले. रोमानीयासोबत संबंध बिघडत होते व चीन व सोविएत संघातून विस्तव जात नव्हता. याच काळात अफगाणिस्तानात १९७९ या वर्षात सैनिकी कारवाई करण्यात आली. ब्रेझनेवने जे परराष्ट्र धोरण राबविले ते 'ब्रेझनेव डॉक्ट्रीन' म्हणून ओळखले गेले. ब्रेझनेवच्या काळात आंतरराष्ट्रीय स्तरावरून सोविएत संघात मानवी हक्कांच्या होत असलेल्या उल्लंघनावर नेहमीच टीका केली जात असे. ब्रेझनेव सत्तेवर असताना मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र निर्मिती करण्यात आली.

१९८२ सालात ब्रेझनेवचा मृत्यू झाला व आंद्रोपोव व चेरनेंको हे दोन वयोवृद्ध नेते काहीकाळ सत्तेवर होते. आंद्रोपोव हा नोव्हेंबर १९८२ ते फेब्रुवारी १९८४ या काळात सत्तेवर होता तर चेरनेंको हा, फेब्रुवारी १९८४ ते मार्च १९८५ या कालावधीत सोविएत संघातील राजकीय यंत्रणा नियंत्रित करत होता. आंद्रोपोव हा सोविएत संघाच्या 'केजीबी' नामक गुप्तहेर संघटनेचा माजी प्रमुख होता. ह्याने वेगवेगळ्या क्षेत्रांत आमूलाग्र बदल व सुधारणा घडविण्याची सुरुवात केली. आर्थिक व औद्योगिक प्रगती साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी आवश्यकता असल्यास विकेंद्रीकरणाचे तत्त्व अवलंबिण्यात आले. भ्रष्टाचाराविरुद्ध मोहीम उघडण्यात आली. वृद्ध व कार्यक्षम नेत्यांना हटवून नवीन दमाच्या तरुण नेत्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या. परंतु दुर्दैवाने आरोग्य ठीक नसल्यामुळे त्याचे निधन झाले व चेरनेंको सत्तेवर आला. त्यावेळी चेरनेंकोचे वय ७२ वर्षे एवढे होते.

अखेर सोविएत संघाला नवीन दमाचा नेता मिळण्यासाठी १९८५ वर्ष उजाडावे लागले. या वर्षात मिखाईल गोर्बाचेव नावाचा नेता सोविएत संघाचा सत्ताधीश बनला. असे म्हटले जाते की, बऱ्याच मोठ्या कालावधीनंतर मिखाईल गोर्बाचेवच्या रूपाने सोविएत संघाला एक चांगला व सुधारणा घडवू शकण्याची दृष्टी असणारा नेता लाभला होता. गोर्बाचेव उच्चशिक्षित होता. त्याने वकिलीचे शिक्षण घेतले होते. परंतु नियतीने गोर्बाचेव व सोविएत संघाच्या नशिबात वेगळेच काही लिहून ठेवले होते.

गोर्बाचेवला सोविएतत संघात सुधारणा घडवून आणावयाच्या होत्या व खऱ्या अर्थाने सामाजिक आर्थिक प्रगती घडवून आणायची होती. यासाठी त्याने 'ग्लॅसनॉस्त' व 'पेरेस्रॉयका' या धोरणांचा स्वीकार केला. ग्लॅसनॉस्त या धोरणांतर्गत देशांतर्गत राजकीय सुधारणांची १९८७ साली घोषणा करण्यात आली. ग्लॅसनॉस्त या धोरणानुसार सोविएत संघामध्ये बौद्धिक व अभिव्यक्तिस्वातंत्र्य

देण्यात आले. यामागची भूमिका अशी होती की, सामान्य जनतेने व बुद्धिवादी वर्गाने सोविएत संघातील नीतीधोरणांवर चर्चा करून त्यातील दोष सरकारच्या निदर्शनास आणावेत, जेणेकरून सरकारला त्यात बदल करता येतील. सोविएत संघातील वृत्तपत्रांना व प्रसारमाध्यमांना देखील मोकळेपणाने लिहिण्याची व विविध विषयांवर चर्चा करण्याची मुभा देण्यात आली. एवढेच नव्हे तर, भूतकाळात सोविएत संघाच्या साम्यवादी सरकारने केलेल्या चुका जनतेच्या निदर्शनास आणून देण्याचे स्वातंत्र्य प्रसार माध्यमांना देण्यात आले. ज्या नेत्यांनी सोविएत संघातील साम्यवादी सरकारवर व त्यांच्या ध्येय धोरणांवर टीका करण्याचे धारिष्ट्य दाखविले होते व त्यामुळे त्यांना तुरुंगवास झाला होता व इतर शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या अशा नेत्यांना आरोपांतून मुक्त करून स्वातंत्र्य बहाल करण्यात आले. काही बंडखोरांना देश सोडून जाण्याची परवानगी देण्यात आली. त्याचप्रमाणे १९३० च्या दशकात ज्या काही नेत्यांना देशद्रोही ठरवून शिक्षा ठोठावण्यात आली होती वा मृत्युदंड देण्यात आला होता असे बरेच नेते निष्पाप असल्याचे व त्यांनी त्याकाळात कुठलाही गुन्हा वा देशद्रोह केला नसल्याचे जाहीर करण्यात आले. प्रसारमाध्यमांना ब्रेझनेवच्या नीतीधोरणांतील चुका दाखवून त्यावर टीका करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. १९८८ साली भरलेल्या साम्यवादी पक्षाची एकोणिसाव्या परिषदेचे व १९८९ सालच्या 'काँग्रेस ऑफ पीपल्स डेप्युटीज्' अधिवेशनाचे दूरदर्शनवर प्रक्षेपण करण्यात आले. हा सगळा प्रकार सोविएत संघाच्या इतिहासात पहिल्यांदाच घडत होता. स्टॅलीनचे रेखाटन नकारात्मक करणारे सिनेमा प्रदर्शित करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच, स्टॅलीनवर टीका करणाऱ्या कादंबऱ्या देखील प्रकाशित करण्याची अनुमती देण्यात आली. ग्लॅसनॉस्त या धोरणाचा खरा 'उद्देश हा सरकारमधील भ्रष्टाचार व अकार्यक्षमता निदर्शनास आणून देणे' त्याचप्रमाणे सामान्य जनतेला देशातील राजकीय यंत्रणेविषयी, अर्थव्यवस्थेविषयी व सरकारी धोरणांविषयी अवगत करून त्यांच्या सकारात्मक सूचना मागवणे व पाठिंबा मिळविणे हा होता. परंतु गोर्बाचेवने अशा शुद्ध हेतूने अवलंबिलेल्या या धोरणाचा परिणाम मात्र विपरीत घडला. हे धोरण आखताना व त्याची अंमलबजावणी सुरू करताना या नेत्याला स्वप्नातही वाटले नसेल की, हे धोरण त्याच्यावरच उलटे फिरेल व सोविएत संघातील साम्यवादी राजवट नष्ट करेल! एवढेच नव्हे तर, सोविएत संघदेखील इतिहास जमा होईल! गोरबाचेवला अपेक्षित असलेल्या सकारात्मक सूचना व बदल न सुचवता प्रसार माध्यमे, बुद्धिवादी लोक व सामान्य जनता ही सरकारच्या जवळजवळ प्रत्येक धोरणांमध्ये चुका काढू लागली व टीका करू लागली. कालांतराने ही टीका रोखणे गोर्बाचेवला शक्य झाले नाही, किंबहुना आता हा सर्व प्रकार थांबविण्याच्या पलीकडे वेळ निघून गेली होती.

'पेरेस्रॉयका' या धोरणाचा मुख्य हेतू सोविएत संघाच्या अर्थव्यवस्थेसह, विज्ञान व तंत्रज्ञान, गुंतवणुकी संदर्भातले धोरण, तसेच इतर अनेक अंतर्गत बाबींमध्ये संरचणात्मक बदल घडविणे हा होता. मात्र १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात गोर्बाचेव यांनी पेरेस्रॉयकाचा उल्लेख प्रमुख्याने आर्थिक बाबतीत बदल घडवून आणण्यासाठीचे धोरण याच अर्थाने केलेला निदर्शनास येतो. त्यानुसार अर्थव्यवस्थेवरील केंद्रीय नियंत्रण कमी करून त्याचे विकेंद्रीकरण करण्यावर भर देण्याचे ठरविण्यात आले. सोविएत संघाच्या इतिहासात पहिल्यांदा लोकांना आपले स्वतःचे खाजगी उद्योग काढण्याची व चालविण्याची अनुमती देण्यात आली. यात उपहारगृहे, कापड उद्योग, हस्तउद्योग, दूरदर्शन संचाची दुरुस्ती करणे, घर व इमारतींना रंग देणे व सजविणे, शिकवण्या घेणे इत्यादी गोष्टींचा समावेश होता. मोठ्या प्रमाणात झालेले यांत्रिकीकरण व संगणकीकरण यामुळे पारंपरिक

पद्धतीच्या नोकऱ्या निर्माण होण्याचे प्रमाण कमी झाले होते. त्यामुळे बदललेल्या नवीन परिस्थितीत कामगारांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे देखील गोर्बाचेव यांच्यासमोरील एक मोठे आव्हान होते. सोविएत संघातील कामगार वर्गामध्ये मद्यप्राशन करणे व व सबळ कारणाशिवाय अनुपस्थित राहणे या दोन महत्त्वाच्या समस्या होत्या. यावर तोडगा काढणे देखील आवश्यक होते. १९८७ च्या जून महिन्यात गोर्बाचेव यांनी एक कायदा करून केंद्रीय योजनाकारांचे कच्चामाल उत्पादन व व्यापार यावरून नियंत्रण काढून टाकले. याऐवजी तत्सम कारखान्यांना ग्राहकांकडून परस्पर त्यांच्या मागणीनुसार वा गरजेनुसार वस्तूंचे उत्पादन करून पुरवठा करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

या धोरणानुसार सोविएत संघाच्या साम्यवादी पक्षात लोकशाहीच्या तत्त्वाचे अनुकरण करण्यात येणार होते. तसेच, राजकीय प्रणालीत न भूतो न भविष्यती असे बदल करण्यात येणार होते. यानुसार पक्षांतर्गत निवडणुकीच्या धोरणाचा अवलंब करून पक्षातील उच्च पदस्थ व्यक्तींची, तसेच कारखान्यातील व्यवस्थापकांची निवड करण्यात येणार होती. यासोबतच गोर्बाचेव यांनी सोविएत संघाच्या राजकीय प्रणालीत महत्त्वाचे संरचनात्मक बदल घडविले. यानुसार २२५० एवढी सदस्य संख्या असलेल्या 'काँग्रेस ऑफ पीपल्स डेप्युटीज्'ची स्थापना करण्यात आली. 'काँग्रेस ऑफ पीपल्स डेप्युटीज्'चे मुख्य कार्य सोविएत संघाच्या ४५० एवढी सदस्यसंख्या असलेल्या 'सुप्रीम सोविएत' नामक संसदेच्या सदस्यांची निवड करणे हे होते. या संसदेचे कार्य वर्षभरातून आठ महिने चालत असे व 'सुप्रीम सोविएत'चा अध्यक्ष हा देशाचा राज्यप्रमुख म्हणून ओळखला जाऊ लागला.

गोर्बाचेव यांनी केलेल्या या राजकीय सुधारणांना साम्यवादी पक्षातील पुराणमतवादी व जुन्या नेत्यांचा विरोध होता. तर मॉस्कोमधील बोरीस येल्तसिन यांच्यासारख्या नेत्यांचे म्हणणे असे होते की, यापेक्षा मोठ्या प्रमाणात सुधारणा घडविण्याची व राजकीय स्वातंत्र्य देण्याची गरज आहे. बोरीस येल्तसिन एकप्रकारे भांडवलशाही व लोकशाही प्रस्थापित करण्याची भाषा करत होते, नव्हे मागणी करत होते. या दोन्ही बाजूंच्या नेत्यांमध्ये गोर्बाचेव भरडून निघाले होते. त्यातच त्यांनी अवलंबिलेल्या आर्थिक सुधारणांमुळे देशाची आर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी गंभीर व्हायला लागली. त्यातच १९९० हे वर्ष जसजसे जवळ यायला लागले तसे साबण, कपडे धुण्याची पावडर, दाढी करण्याचे ब्लेड, कपबशा, दूरदर्शन संच इत्यादी वस्तू, तसेच अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला. बेकारीचे प्रमाण वाढत चालले होते. पेन्शनवर जगणाऱ्या लोकांवर लोकांची परिस्थिती खालावत चालली होती व समाजातील बरेचसे लोक गरिबी रेषेच्या खाली राहत होते. दुर्दैवाने या बिकट स्थितीवर मार्ग काढणे गोर्बाचेव यांना कठीण झाले.

सोविएत संघ हा १५ वेगवेगळ्या प्रांतांनी बनलेला साम्यवादी देश होता. असे म्हटले जाते की, यात यातील बऱ्याचशा प्रांतांना साम्यवादी शासकांनी व त्यापूर्वी झारने त्यांच्या मर्जीविरुद्ध समाविष्ट करून घेतले होते. १९९० सालापासून यातील अनेक प्रांत सोविएत संघातून बाहेर पडण्याची भाषा करू लागले. यात पश्चिमेकडील लिथुआनिया, इस्टोनिया व लॅटविया यांचा प्रामुख्याने समावेश होता. बोरीस येल्तसिन हा रशिया या प्रांतातील नेता होता. याचेदेखील असे म्हणणे होते की, सोविएत संघातील ज्या प्रांतांना बाहेर पडायचे असेल त्यांना तशी अनुमती देण्यात यावी. १९९० साली बोरीस येल्तसिन याची रशियन प्रांताच्या संसदेच्या अध्यक्षपदी निवड झाली. तेव्हापासून बोरीस येल्तसिन यांनी सोविएत संघाचे विघटन होईपर्यंत व साम्यवादाचा पाडाव होईपर्यंत माघार घेतली नाही असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांनी बहुपक्षीय पद्धती व सार्वत्रिक

निवडणुका घेण्याच्या मागणीचा सपाटा लावला. तर दुसऱ्या बाजूने जुन्या साम्यवादी नेत्यांना गोर्बाचेव, तसेच येल्तसिन यांची धोरणे अजिबात पसंत नव्हती. शेवटी १८ ऑगस्ट १९९१ रोजी गोर्बाचेव आराम करण्यासाठी गेले असताना त्यांना नजरकैद करण्यात आले. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्यास नकार दिला. तिकडे राजधानी मॉस्कोमध्ये सांगण्यात आले की, गोर्बाचेव हे आजारी आहेत. बोरीस येल्तसिन यांना अटक न करण्याची चूक या बंडकर्त्यांना महागात पडली. जेव्हा मॉस्कोत लष्कराचे रणगाडे आले तेव्हा बोरीस येल्तसिन हे एका रणगाड्यावर चढले व लोकांना उद्देशून भाषण करू लागले. अशा परिस्थितीत लष्कर भांबावून गेले व त्यांना जनतेत लोकप्रिय असलेल्या बोरीस येल्तसिन यांच्यावर कारवाई कशी करावी हा प्रश्न पडला. शेवटी बंडकर्त्यांनी माघार घेतली व त्यांना अटक करण्यात आली व गोर्बाचेव मॉस्कोत परत आले. परंतु त्यांना स्वतःलाच कळणे अशक्य झाले की, नेमके या नवीन राजकीय परिस्थितीत त्यांचे नेमके स्थान व भूमिका काय होती? गोर्बाचेव यांना नाइलाजाने १९९१ च्या नाताळात आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. बोरीस येल्तसिन हे रशियन फेडरेशन म्हणजेच आजचा रशिया या देशाचा राष्ट्राध्यक्ष म्हणून स्वतंत्रपणे कारभार करू लागले. हळूहळू युक्रेन, बेलारूस, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, ताजिकिस्तान, किरगिझस्तान, कझाकस्तान, इत्यादी प्रांत सोबत संघातून बाहेर पडले व १९९१ सालापर्यंत सोविएत संघ हा देश व तेथील साम्यवादी राजवट व पक्ष संपुष्टात आले.

बोरीस येल्तसिन यांनी अगोदर कितीही वल्गना केल्या असल्या तरी त्यांना राष्ट्राध्यक्ष म्हणून रशियातील आर्थिक समस्या सोडविण्यात सपशेल अपयश आले. त्यातल्यात्यात चेचन्यासारख्या मुस्लिम बांधवांची बहुसंख्य संख्या असणाऱ्या प्रांताने बंड करून रशियातून बाहेर पडण्याचा मार्ग पत्करला. बोरीस येल्तसिन यांच्या मद्यप्रेमाविषयी तर काही सांगायलाच नको. असे म्हटले जाते की, १९९२ ते २००० या कालावधीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असलेले बिल क्लिंटन हे रशियात म्हणजेच मॉस्कोत पहाट असेल तेव्हा अमेरिकेहून येल्तसिन यांना बोलण्यासाठी दूरध्वनी करत असत! याचे कारण असे होते की, एकदा का सूर्य वर चढला व जसजसा दिवस कलू लागला तसतसे येल्तसिन मद्यप्राशन न केलेल्या स्थितीत सापडणे कठीण असे. शेवटी ३१ डिसेंबर १९९९ रोजी बोरीस येल्तसिन यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व एकेकाळी सोविएत संघाच्या 'केजीबी' या गुप्तहेर संघटनेचे सदस्य असलेल्या ब्लादिमीर पुतीन यांच्याकडे सत्तासूत्रे सुपूर्त केली. मागील २१ वर्षांपासून रशियातील राजकीय सत्ता ब्लादिमीर पुतीन यांच्या हातात आहे.

अशाप्रकारे सोवियत संघामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने मिखाईल गोर्बाचेव यांनी ज्या सुधारणा घडविल्या त्याचा अगदी उलटा परिणाम होऊन त्यांच्या ध्यानीमनी नसणारे चित्र पुढे आले. अभ्यासकांच्या मते; जर गोर्बाचेव यांनी राजकीय सुधारणा, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, तसेच प्रसारमाध्यमांना ढील न देता, जर साम्यवादी चीनप्रमाणे फक्त आर्थिक सुधारणांवर लक्ष केंद्रित केले असते तर कदाचित आजही सोविएत संघ व तेथील साम्यवादी राजवट अस्तित्वात असती. १९९० सालचा शांततेचा नोबेल पुरस्कार गोर्बाचेव यांना देण्यात आला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी बोलावयाचे झाल्यास त्यांची उंची पाच फूट नऊ इंच एवढी होती; तसेच ते जबाबदारीने मद्यप्राशन करत असत. स्त्रीदाक्षिण्याविषयी ते प्रसिद्ध होते. स्त्रियांशी ते नेहमीच अदबीने वागत व बोलत असे जाणकार सांगतात. एकूणच त्यांचे व्यक्तिमत्त्व एका सज्जन व्यक्तीचे होते. त्यांनी १९९६ सालात रशियन प्रजासत्ताकाची निवडणूक लढवली होती. परंतु त्यांचा पराभव झाला.

(पृष्ठ क्र.३१ वर)

# डॉ. शेखर बसू : अणुइंधन पुनर्चक्रण पूर्णत्वास नेणारे अणुशास्त्रज्ञ

*आण्विक इंधन पुनर्चक्रण करण्यास परिपूर्णता देणारे शास्त्रज्ञ डॉ. शेखर बसू यांची माहिती देणारा लेख - संपादक*

केरळमधील अल्वाये येथील वाळूत युरेनियम आणि थोरियमची खनिजे मिळतात. ही दोन्हीही मूलद्रव्ये अणुभट्टीकरता उपयोगात आणता येणारी अणुइंधने आहेत. त्यांवर प्रक्रिया करून, त्यांचे शुद्धीकरण करून, समृद्धीकरण (एन्रिचमेंट) करून त्यांपासून आण्विक इंधने तयार केली जातात. अशी इंधने मग अणुभट्टीत वापरता येतात. अणुइंधने सामान्य इंधनांच्या अब्जपट अधिक ऊर्जा देऊ शकतात. खनिज गवेषणापासून तर अणुइंधनांतली ऊर्जा विद्युतऊर्जेत रूपांतरित करण्यापर्यंतच्या प्रक्रियेला अणुइंधनचक्राचा पूर्वार्ध (फ्रंट एंड) म्हणतात.

मात्र वापरलेली अणुइंधने अत्यंत किरणोत्सारी असतात. सजीवांकरता अत्यंत अपायकारक असतात. त्यांतील किरणोत्सार संहत (कॉन्सेंट्रेट) करून सुरक्षितरित्या काचस्वरूपात संघनित केला जातो. तो संघनित किरणोत्सारही त्याची अपायकारकता नाहीशी होईपर्यंत तरी, दीर्घकाळ सांभाळत राहावा लागतो. हे करत असताना त्यातून अत्यंत मूल्यवान असे प्ल्युटोनियम नावाचे मूलद्रव्यही प्राप्त होत असते. प्ल्युटोनियमचा उपयोग आण्विक स्फोटके तयार करण्यासाठी होऊ शकतो. वापरलेल्या इंधनांतील किरणोत्सार काचेत संघनित करून सांभाळण्यापर्यंत आणि त्यातून निर्माण झालेल्या प्ल्युटोनियम सारख्या पदार्थांवर प्रक्रिया करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियांना मिळून अणुइंधनचक्राचा उत्तरार्ध (बॅक एंड) म्हणतात.

येथवरच्या अणुइंधनचक्रातील सगळ्या प्रक्रिया आपल्या भारत देशाने स्वबळावर, अत्यंत यशस्वीरित्या आणि सुरक्षितपणे साध्य केलेल्या आहेत. म्हणूनच आपला देश केवळ अणुऊर्जा संपन्नच नाही तर अण्वस्त्र सज्जही झाला आहे. एवढेच नव्हे तर, त्यातून उद्भवणारा किरणोत्सार अल्पांशात काचबद्ध करून तो सुरक्षित सांभाळण्याचे तंत्रही भारताने अवगत करून घेतलेले आहे. त्यामुळे आण्विक दृष्टीने तो सुरक्षितही झालेला आहे.

अनेकदा देश ही प्रगती करत आहे हेही आपल्याला माहीत नसते आणि नेमक्या कोणत्या शास्त्रज्ञांचा ह्यात सहभाग होता ही माहितीही आपल्याला नसते. म्हणून अणुइंधनचक्राचा उत्तरार्ध भारतात विकसित करण्याच्या प्रक्रियेत मोलाचा वाटा उचलणाऱ्या एका अणुशास्त्रज्ञाची आपण ह्या लेखात ओळख करून घेणार आहोत. त्यांचे नाव आहे डॉ. शेखर बसू. त्यांचा जन्म २०-०९-१९५२ रोजी झाला. बालीगंज गव्हर्नमेंट स्कूल, कोलकाता येथून त्यांनी शालेय शिक्षण घेतले. त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या वीरमाता जिजाबाई तंत्रसंस्थेतून १९७४ साली यांत्रिकी अभियंत्रज्ञ ही पदवी प्राप्त केली. भाभा अणुसंशोधन केंद्राच्या प्रशालेच्या १८ व्या तुकडीतून एक वर्षाचा अणुविज्ञान व अभियांत्रिकीतील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करून, ते १९७५ साली भाभा अणुसंशोधन केंद्राच्या अणुभट्टी अभियांत्रिकी विभागात रुजू झाले.

डॉ. शेखर बसू हे अपवादात्मक क्षमतेचे अभियंत्रज्ञ आहेत. १९ जून २०१२ ते २३ फेब्रुवारी २०१६ दरम्यान ते भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक होते.



त्यांनी आण्विक विज्ञान व अभियांत्रिकीच्या बहुविध क्षेत्रांत कळीची भूमिका निभावली. भारतास आण्विक क्षेत्रात नेतृत्व प्राप्त करवून देण्यातील त्यांच्या योगदानाचा, ३१-०३-२०१४ रोजी राष्ट्रपती भवनात तत्कालीन राष्ट्रपती प्रणब मुखर्जी ह्यांचे हस्ते पद्मश्री देऊन सन्मान करण्यात आला. नंतर अणुऊर्जा विभागाच्या मुंबई येथील मुख्यालयात २३ ऑक्टोबर २०१५ रोजी त्यांनी भारत सरकारचे सचिव आणि भारतीय अणुऊर्जा आयोगाचे अकरावे अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला. २०-०९-२०१८ रोजी त्यांना अवकाश प्राप्त झाला. आज ते होमी भाभा अध्यासनावरील अणुऊर्जाविभागाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

सुरुवातीस डॉ. बसू ह्यांनी तारापूर येथील 'उकळते पाणी अणुभट्टी' करतानाच्या अणुइंधन घटकांच्या अभिकल्पनांचा सखोल अभ्यासही केलेला आहे. ही त्यांची कामगिरी अपवादात्मकरित्या उत्तम होती. नंतर त्यांनी अणुपाणबुडी संयंत्र विकासाची जबाबदारी स्वीकारली. मुळापासून सुरुवात करून कळपक्कम येथे प्रारूप संयंत्र तयार केले.

प्रारूप सागरी आण्विक परिवहन संयंत्राचे प्रकल्प संचालक म्हणून डॉ. बसू ह्यांनी तत्संबंधित सर्व क्रियाकलापांचे यशस्वीरित्या विकसन केले. हा बहुशास्त्रीय प्रकल्प; मोठ्या संख्येतील अणुभट्टी घटक, वाफप्रणाली, विद्युत आणि उपकरणन प्रणालींचे अभिकल्पन आणि विकास करण्याचा होता. संयंत्रांकरता लागणाऱ्या उपस्कर आणि प्रणालींच्या चाचणी परीक्षणांकरता अनेक चाचणी सुविधा स्थापन करण्यात आल्या. व्यूहरचनात्मक महत्त्वाचे हे संयंत्र कळपक्कम येथे स्थापन करण्यात आले होते आणि आजही ते कार्यरत आहे. वर्तमान संशोधन आणि प्रशिक्षणार्थ सुविधा ह्या संयंत्राभोवती स्थापन करण्यात आलेल्या आहेत. परिवहन संयंत्र घटकांचा विकास आणि विशेष मनुष्यबळाच्या प्रशिक्षणार्थ त्या वापरल्या जात आहेत. आण्विक परिवहन संयंत्राच्या समुद्री आवृत्ती संदर्भात, डॉ. बसू आजही शास्त्रज्ञांना मार्गदर्शन करत आहेत.

डॉ. शेखर बसू आण्विक पुनर्चक्रण मंडळाचे प्रमुख होते. त्या अधिकारात, आण्विक पुनर्चक्रण आणि अपशिष्ट व्यवस्थापन संयंत्रांचे अभिकल्पन, विकास, उभारणी आणि संचालनास ते जबाबदार होते. अणुइंधन पुनर्चक्रण आणि आण्विक अपशिष्ट व्यवस्थापन विषयक अनेक कार्यक्रमांना त्यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले. त्यांनी अनेक पुनर्चक्रण संयंत्रे, अणुइंधन साठवण सुविधा, आण्विक अपशिष्ट सुविधा ह्यांचे अभिकल्पन केलेले असून; ट्रॉम्बे, तारापूर आणि कळपक्कम येथे त्यांची उभारणीही यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. त्याकरता आवश्यक तो संशोधन आणि विकास कार्यक्रमही त्यांनी राबवला आहे. त्या अंतर्गत संयंत्र-कर्तब-उद्धरणार्थ (अपग्रेड ऑफ प्लांट परफॉर्मन्स) आणि पर्यावरणीय मुद्यांच्या निरसनार्थ; घटक, प्रणाली आणि प्रक्रिया यांचा विकास करण्यात आलेला आहे. तारापूर येथे, उच्चस्तरीय आण्विक अपशिष्टाचे काचभवन (व्हिट्रिफिकेशन) करण्यासाठी वापरलेल्या, तप्त-चिनीमाती-वितळकाचे (ज्यूल हिटेड सिरॅमिक मेल्टर) डॉ. बसू यांनी दूरचालनाद्वारे निष्कार्यान्वयन (रिमोट डिकमिशनिंग) यशस्वीरित्या पूर्ण केलेले आहे. ह्या कार्यवाहीने 'निष्कार्यान्वयनाचे अभिकल्पन' संकल्पनेकरता महत्त्वाची माहिती पुरवलेली आहे.

प्रामुख्याने डॉ. शेखर बसू आणि त्यांच्या

सहकाऱ्यांनीच निरनिराळ्या पातळीवरील किरणोत्सारी वायू, द्रव आणि घनरूप अपशिष्टांच्या (रेडिओऍक्टिव्ह गॅशस, लिक्विड अँड सॉलिड वेस्ट) सुरक्षित विल्हेवाटीची व्यूहरचना (सेफ डिस्पोजल स्ट्रॅटेजी) उत्क्रांत केली. आण्विक अपशिष्टांच्या प्रभावी व्यवस्थापनात त्यांचा सहभाग होता. ज्यात अंतीम विल्हेवाटीपूर्वी किरणोत्सारी अपशिष्टांचे पृथक्करण, स्वभावांकन, हाताळणी, उपचार, अवस्थांतरण आणि देखरेख (सेग्रेगेशन, कॅरेक्टरायझेशन, हँडलिंग, ट्रीटमेंट, कंडिशनिंग अँड मॉनिटरिंग) ह्यांचा समावेश होत असतो. निरनिराळया प्रकारच्या किरणोत्सारी, आण्विक उच्चस्तरीय द्रव अपशिष्टांच्या सुरक्षित व्यवस्थापनाच्या औद्योगिक कार्यचालनाचा त्यांना भरपूर अनुभव आहे. आण्विक अपशिष्टांच्या सुरक्षित व्यवस्थापनावरच अणुऊर्जेचा सामुदायिक स्वीकार बव्हंशी अवलंबून असतो. डॉ. बसू ह्यांनी, सर्व दाबित जड पाणी अणुभट्ट्यांच्या संपूर्ण चक्र संचालनोत्तर प्रक्रियांसाठी सर्वोत्तम पद्धती विकसित केल्या आहेत. भारतीय समुदायाने म्हणूनच अणुऊर्जेचा स्वीकार केला आहे.

डॉ. बसू ह्यांनी, पहिल्या समाकलित आण्विक पुनर्चक्रण संयंत्राचे अभिकल्पन करून, भारतीय आण्विक पुनर्चक्रण कार्यक्रमास उच्च दर्जाची परिपक्वता प्राप्त करून दिलेली आहे. त्यामुळे भारतीय अणुइंधनचक्राच्या उत्तरार्ध कार्यक्रमास आणि विशेषतः आण्विक अपशिष्ट व्यवस्थापन कार्यक्रमास एक वेगळीच उंची प्राप्त होणार आहे.

आण्विक पदार्थांच्या परिवहनाशी संबंधित मुद्यांवरही त्यांनी काम केलेले आहे. डॉ. बसू ह्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांतून अनेक शोधनिबंध लिहिलेले आहेत. अनेक अविनाशी आणि नाशकारक तंत्रांचा उपयोग करून आण्विक पदार्थांतील उर्वरित अ-समान तणावांच्या मूल्यांकनांवरही डॉ. बसू ह्यांनी काम केलेले आहे. ज्यात भारतही एक सहभागी देश आहे, असा एक आंतरराष्ट्रीय उष्माण्विक प्रायोगिक अणुभट्टी (इंटरनॅशनल थर्मोन्युक्लिअर एक्सपरिमेंटल रिऍक्टर- आ.ई.टी.आर. अशी अणुभट्टी कंकणाकार संदलन अणुभट्टी असते. तिला तोराईडलन्ग कॅमेरा मॅकिना -टोकॅमॅक- बेस्ड फ्युजन रिऍक्टर म्हणतात.) प्रकल्प, सध्या कडार्चे, फ्रान्स येथे स्थापन होत आहे. डॉ. बसू हे त्याच्या उष्णता निष्कासन आणि शीतक जल प्रणालींच्या अभिकल्पन पुर्निरीक्षण समितीचे अध्यक्ष आहेत. हा प्रकल्प जागतिक समुदायास दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा पुरवेल अशी अपेक्षा आहे.

प्रकल्प व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष ह्या नात्याने त्यांनी तमिळनाडूत 'भारतीय न्युट्रीनो वेधशाळा' स्थापन केली आहे. प्रमुख समन्वयक म्हणून ते त्वरक-चालित-प्रणाली (ऍक्सिलरेटर ड्रिव्हन सिस्टिम) करता, १-अब्ज विजकव्होल्टचा अतिवाहक त्वरक विकसित करणाऱ्या चमूचे नेतृत्व करत आहेत. भाभा अणुसंशोधन केंद्राच्या वायझॅक तळावर, अणु-इंधन-चक्र कार्यतळ (न्युक्लिअर फ्युएल सायकल पार्क) उभा करण्याच्या प्रकल्पासही ते मार्गदर्शन करत आहेत. ह्या प्रकल्पात संशोधन अणुभट्ट्या, इंधन निर्मिती आणि पुनर्चक्रण सुविधांचा समावेश असणार आहे. भारतीय दाबित पाणी अणुभट्टीच्या अभिकल्पनासही त्यांनी सुरुवात केलेली आहे.

इथे हे नमूद करावे लागेल की, भारताचा अणुऊर्जा कार्यक्रम आजवर नैसर्गिक युरेनियम आणि जडपाणी विमंदकाचे (हेवी वॉटर मॉडरेटर) आधारे चालत आलेला आहे. काक्रापार येथे नुकतीच भारताने २३-वी अणुभट्टी कार्यान्वित केली. ह्यांतील बहुसंख्य अणुभट्ट्या 'दाबित-जडपाणी' अणुभट्ट्या आहेत. अणुपाणबुडीकरता मात्र थोड्या जागेत अभिकल्पन करायचे असते, म्हणून 'दाबित पाणी अणुभट्टी' वापरली जाते. आता भारत ऊर्जानिर्मितीकरताही 'दाबित पाणी अणुभट्टी' निर्माण करेल, असाच ह्याचा अर्थ होत आहे.

(पृष्ठ क्र. २४ वर)

# देशोदेशींचे लॉकडाऊन

*Covid-19 या रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी विविध देशांमध्ये लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊन अर्थात टाळेबंदीचा लेखाजोखा या लेखात मांडण्यात आलेला आहे. हा लेख म्हणजे लॉकडाऊनचा कालावधी आणि त्याचे स्वरूप याचे तुलनात्मक विश्लेषण आहे – संपादक*

मार्च महिन्याच्या सुरुवातीपासून देशपातळीवर कोरोनाचा प्रादुर्भाव प्रकर्षाने जाणवू लागला आणि ही भयंकर साथ आटोक्यात आणण्याच्या हेतूने देशव्यापी 'लॉकडाऊन'ची घोषणा २४ मार्च २०२० या दिवशी रात्री ८ वाजता पंतप्रधान मोदी यांनी केली. त्या दिवसापासून आजतागायत कमी–अधिक प्रमाणात लॉकडाऊनचा हा काळ आपल्या सर्वांच्या जगण्यात सामील झाला. लॉकडाऊन अर्थात टाळेबंदी या शब्दाचा शब्दकोषी अर्थ 'दंगेधोपे रोखण्याच्या दृष्टीने कैदी आणि गुन्हेगारांचा तुरुंगवास नियमित करणे' असा होतो! अर्थात करोना व्हायरसचा फैलाव या पूर्णतः वैद्यकीय आणि आरोग्यविषयक मुद्यावर लॉकडाऊनची घोषणा होणे आणि या शब्दाचा शब्दकोषीय अर्थ व त्याच्या विविध अर्थच्छटा यांचा तसा संबंध कमीच आहे.

चीनमधील वुहान प्रांतातून संपूर्ण जगात पसरलेल्या या विषाणूने भल्याभल्या देशांची आरोग्य व्यवस्था आणि पर्यायाने अर्थव्यवस्था हादरवून टाकली. इटली आणि त्यापाठोपाठ स्पेन, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या युरोपीय देशांतून आंतरराष्ट्रीय प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या माध्यमातून हा व्हायरस (विषाणू) अमेरिकेत देखील पोचला आणि आजतागायत या विषाणूद्वारे संक्रमित झालेल्या नागरिकांच्या क्रमवारीत अमेरिका प्रथम क्रमांकावर आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाची आरोग्यव्यवस्था, जनजीवन, अर्थकारण खिळखिळे करून या विषाणूच्या प्रसार आणि प्रतिरोधक यंत्रणेचे व्यवस्थापन याचा प्रभाव या देशाच्या आगामी निवडणूका आणि राजकारणावर देखील पडणार हे निश्चित. अमेरिकेतील जनजीवन आणि लोकांचे मानसिक स्वास्थ्य या सर्वांना एक जबर धक्का या विषाणूच्या प्रसारामुळे बसलेला आहे.

या शिवाय जपान, सिंगापूर, इंडोनेशिया, स्वीडन अशा सर्वच देशांत या विषाणूचा प्रसार झाला आणि अनेकविध मार्गांचा अवलंब करून ही साथ आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. जपानचे पंतप्रधान शिंझो आबे यांनी तर कोरोना विषाणूच्या फैलावास, 'दुसऱ्या महायुद्धानंतर जगावर ओढवलेले मोठे संकट' या शब्दांत संबोधले.

थोडक्यात, कोरोना विषाणूच्या फैलावाने त्रस्त झालेल्या देशांनी सार्वजनिक आरोग्य आणि व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी अनेकविध उपाय योजले व त्यापैकीच एक सार्वत्रिक उपाय म्हणजे, 'टाळेबंदी आणि सामाजिक अंतराचे पालन'. (Lockdown and Social distancing) आणि त्यापाठोपाठ आयसोलेशन, क्वारंटाईन असे शब्द आपल्या दैनंदिन जीवनात परवलीचे झाले. जागतिक पातळीवर लॉकडाऊनचा पहिला प्रयत्न अर्थातच चीनमध्ये झाला आणि चीनच्या नेहमीच्या नियंत्रित, प्रशासकीय शिस्तीत याची अंमलबजावणी होऊन ही भयंकर साथ आटोक्यात आल्याचे चीनकडून सांगण्यात आले. मात्र तोवर या विषाणूने जगभर आपले हात–पाय वेगाने पसरायला सुरुवात केली होती. चीनमध्ये देशव्यापी लॉकडाऊन लागू न करता शहरपातळीवर टप्प्याटप्प्याने लॉकडाऊन लागू करण्यात आला. २३ जानेवारी २०२० ते साधारण मार्च अखेरीस चीनमधील हुबेई प्रांतातील १६ शहरांमध्ये लॉकडाऊन लागू केला

गेला व या विषाणूच्या प्रसारावर कमालीचे यशस्वी नियंत्रण राखले गेले. आश्चर्य म्हणजे चीनच्या बीजिंग इ. प्रांतांपर्यंत ही साथ म्हणावी इतकी पसरली नाही. यावरून आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनवर टीकेची झोड उठवली गेली आणि या विषाणूचा प्रसार ही चीनची खेळी आहे असाही दावा करण्यात आला.

चीनवर अनेक आर्थिक निर्बंध लादले गेले आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनची नाकेबंदी सुरू झाली. या दरम्यान इतर देशांनाही लॉकडाऊनची अंमलबजावणी करणे भाग होते. या देशोदेशींच्या लॉकडाऊनचा गोषवारा पुढीलप्रमाणे :

| **देशाचे नाव** | **लॉकडाऊनचा कालावधी** | **एकूण दिवस** |
|---|---|---|
| १. फ्रान्स | १७ मार्च – ११ मे | ५६ |
| २. जर्मनी | २३ मार्च – १० मे | ४८ |
| ३. इटली | ९ मार्च – १८ मे | ७० |
| ४. रशिया | ३० मार्च – ३० एप्रिल | ३१ |
| ५. सिंगापूर | ७ एप्रिल – १ जून | ५३ |
| ६. अमेरिका* | १९ मार्च – १३ जून | ८४ |
| ७. भारत | २५ मार्च – ७ जून | ७३ |

*अमेरिका – प्रांतस्तरावरील लॉकडाऊन

वरील आकडेवारीवरून जगातील विविध देशांत लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनचा अंदाज बांधता येतो. पैकी अमेरिकेत देशव्यापी लॉकडाऊन न लावता प्रांतस्तरावर लॉकडाऊन लागू करण्यात आला तर इतर अनेक देशांत लागू करण्यात आलेले लॉकडाऊन देशव्यापी स्वरूपाचे होते.

आपल्या देशाच्या बाबतीत देशव्यापी लॉकडाऊनची घोषणा २४ मार्च रोजी झाली आणि ३ टप्प्यांत हा लॉकडाऊन वाढवला गेला. १ जूनपासून टप्प्याटप्प्ने हा लॉकडाऊन उठवला गेला व या निर्णयांची अंमलबजावणी ७ जून पासून सुरू झाली. ऑक्सफर्ड विद्यापीठाने केलेल्या पाहणीनुसार लॉकडाऊनच्या विविध निकषांचा आधार घेऊन लॉकडाऊन निर्देशांक प्रस्तृत केला गेला. या निर्देशांकानुसार लॉकडाऊन जाहीर केलेल्या सुमारे ५० देशांत सर्वात दीर्घ व कडक असा लॉकडाऊन भारतात लागू केला गेला होता.

साथीचा रोग आटोक्यात आणण्यासाठी लॉकडाऊन हा उपाय कितपत यशस्वी ठरतो हा विवाद्य मुद्दा आहे. परंतु लॉकडाऊनची तीव्रता आणि कालावधी याचा तारतम्याने विचार होणे ही सर्व सामान्यांच्या जीवनाच्या दृष्टीने आवश्यक गोष्ट आहे. देशव्यापी लॉकडाऊनच्या घोषणेनंतर स्थलांतरित मजुरांची झालेली होरपळ, सार्वजनिक व्यवस्थांवरचा असह्य ताण, जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धीसाठी सामान्यांची झालेली त्रेधातिरपीट हे सगळं आपण त्या काळात पाहिलेलं, अनुभवलं आहे.

लॉकडाऊनच्या दरम्यान आणि त्यानंतरही ही साथ कितपत आटोक्यात आली आणि या साथीवर भारत कधी नियंत्रण मिळवणार या प्रश्नाशी आपली आरोग्य यंत्रणा झुंजत आहे आणि या विचित्र रोगाच्या भीतीने आपलं दैनंदिन आयुष्य ग्रासलं आहे. लॉकडाऊनमधून टप्प्याटप्प्याने आपली सुटका होत असली तरी या रोगाचा जबर विळखा दिवसेंदिवस आवळला जातो आहे. रोजच्या जगण्याच्या ओढीने घराबाहेर पडणारी माणसे 'कोरोना'ची चिंता घेऊन जगत आहेत. योग्य ती काळजी घेऊन स्वतःची रोगप्रतिकार क्षमता वाढवणे हाच सध्यातरी एकमेव मार्ग या परिस्थितीत दिसतो. देशोदेशी लावण्यात आलेले लॉकडाऊन आणि त्याची परिणती यातून हाच संदेश घेता येण्यासारखा आहे.

**– अपर्णा कुलकर्णी**
सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई
भ्रमणध्वनी : ७७६८०२७६५८

# शिक्षण व शिक्षकांचे बदलते स्वरूप

*शिक्षणाचे स्वरूप आधीच्या काळापासून आजच्या प्रगत काळापर्यंत बदलत गेले आहे. पाच सप्टेंबर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने शिक्षणाच्या बदलत्या स्वरूपाबद्दल प्रस्तुत लेख – संपादक*

प्राचीनकाळापासून आजपर्यंत शिक्षण देण्याचे काम हे शिक्षकच करत आले आहेत. प्राचीनकाळी शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे मोक्षप्राप्ती मिळवणे, धार्मिक प्रवृत्ती निर्माण करणे, चारित्र्य निर्मिती करणे, व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवणे, सामाजिक कर्तव्याची ओळख करून घेणे, संस्कृती रक्षण व संस्कृती संवर्धन करणे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एक प्रकार वैदिक ज्ञानाची परंपरा मुखोद्गत करणे या स्वरूपाचा व दुसरा प्रकार हा चिंतन आणि मनन या स्वरूपाचा होता.

वैदिक काळात शिक्षणासाठी विद्यार्थी गुरू गृही राहून शिक्षण घेत असत. विद्यार्थ्यांना उपनयन झाल्यावर गुरुकुलात पाठवले जाई व तेथे गुरू विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार शिक्षण देत असत. गुरू वस्तीपासून दूर अरण्यात राहत असत. विद्यार्थी गुरूंना आदर्श मानून त्यांच्या घरीच राहण्यास जात असत. शिक्षकासाठी दोनच आदर्श होते. तो ज्ञानाचा उपासक असावा व आध्यात्मिक प्रगतीच्या दिशेने विद्यार्थ्यांचे शिक्षण वाढवावे अशी अपेक्षा होती. विद्यार्थी मग तो राजकुमार असला तरीही तो गुरूच्या आश्रमात शिक्षणासाठी जात असे. शिष्याची नित्यकर्मे आखून देत असत. त्याप्रमाणे शिष्य वर्तन करत असत. प्राचीनकाळी शिक्षण हे मौखिक ज्ञानाच्या स्वरूपात दिले जाई. शिष्यादिच्छेत पराजयम् या उक्तीप्रमाणे शिष्याचे ज्ञान गुरू पेक्षाही वरचढ असावे हा आदर्श या उक्तीतून दिसून येतो. गुरू विषयी कायम आदरभाव असणे हे या शिक्षण पद्धतीचे वैशिष्ट्य होते. कितीही उच्च कुळातील शिष्य असेल तरीही त्याला सर्व प्रकारची कामे व भिक्षा मागणे यांना कमी प्रतीचे मानले जात नसे. शिक्षण संपेपर्यंत गुरूगृही राहून अध्ययन करावे लागे. काय शिकवायचे हे गुरू ठरवत असत. अनेक शिक्षण पद्धतीचा विकास झाला त्यात बौद्ध काळातील शिक्षण, भाषावाद, शिक्षणाचा पाझर सिद्धांत, शिक्षणाची सुधारणा करण्यासाठी अँडमच्या सूचना, भारतीय शिक्षणाचा पहिला आयोग हंटर कमिशन, भारतीय विद्यापीठ शिक्षण आयोग, कलकत्ता विद्यापीठ आयोग, राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ, वर्धा शिक्षण योजना, युद्धोत्तर शिक्षण इ. सुधारणा झाल्या. स्वातंत्र्यानंतर शिक्षणात आमूलाग्र बदल झाला.

राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग, कोठारी आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व शेवटी १९९३ ला सर्वांसाठी शिक्षण देण्याचे ठरले.

या बदलत्या शिक्षणाच्या स्वरूपा बरोबर शिक्षकाच्या संकल्पना व पात्रताही बदलत गेल्या. प्रत्येक वर्गाप्रमाणे शिक्षकांचे शिक्षणही असले पाहिजे त्यासाठी व्यवसायिक पात्रता आली. शिक्षणाच्या व्याख्याही बदलत गेल्या. व्यक्तीचा सर्वांगीण विकास शिक्षणातून व्हावा व एक सुजाण नागरिक बनावा अशी अपेक्षा राष्ट्रीय अभ्यासक्रम २००५ व राज्य अभ्यासक्रम २०१० आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार तेरा गाभाघटक दहा मूल्ये आणि दहा जीवन कौशल्य याचा विकास करून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनातून जबाबदार नागरिक घडवण्यासाठी शिक्षण, शिक्षक देऊ लागले. अध्यापनाच्या विविध पद्धती विकसित झाल्या. त्यामुळे विविध विषयांचे शिक्षण देणे सोपे झाले. निसर्गवादापासून ते ज्ञान रचनावादा पर्यंत विविध अध्यापन

माणसाचा खरा शत्रू कोण असतो?.. तर तो स्वतःच असतो!

पद्धती वापरून शिक्षण देताना शिक्षक आणि विद्यार्थी यांचे गुरू-शिष्य नाते संपून हसत खेळत शिक्षण सुरू झाले. प्रत्येक गावी शाळा सुरू झाल्या. छोट्या गावातील एक शिक्षकी शाळेचे द्विशिक्षकी शाळेत रूपांतर झाले. मोठ्या गावांत विद्यार्थी संख्या व शिक्षक संख्या अधिक आहे अशा गावांतून अनेक खाजगी शाळा सुरू झाल्या. सरकारी शाळा सोडून खाजगी शाळेत प्रवेश घेणे प्रतिष्ठेचे होऊन गेले. पण पुढे खाजगी शाळेतही ही संख्या कमी होऊन सूट, बूट आणि स्कूल बस यामुळे व इंग्रजी बोलण्यामुळे इंग्रजी शाळेचे आकर्षण वाढले. मराठी भाषीय विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणे इंग्रजी शाळेतही अवघड होऊन बसले.

शाळा कोणतीही असो; शिक्षक हा शिक्षकच असतो. मी एक जिल्हा परिषद कासारखेडा शाळेतील उपक्रमशील शिक्षिका. जिल्हा परिषद शाळांत खूप चांगल्या प्रकारे शिक्षण दिले जात आहे. शिक्षकांनी समाज सहभागातून व स्वतः शालेय रंगरंगोटी व भौतिक सुविधा प्रत्येक शाळेत करून घेतली आहे. सर्व विषय ज्ञानरचनावादी पद्धतीने शिकवले जातात. विविध उपक्रमांमधून शिक्षण देण्यासाठी शिक्षक आपल्या नवोपक्रमाचे नियोजन करून अमलबजावणी करत आहेत. प्रगत वर्ग व शाळा प्रगत करण्यासाठी अखंड कार्य करत आहेत. शाळेतून वर्ग निहाय विषय हे निहाय अध्यापन पद्धतीतून अध्ययन निष्पत्तीवर काम करून, वर्गनिहाय अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांना अवगत व्हाव्या यासाठी प्रयत्न चालू असतानाच कोरोना सारखी महामारी आली व शिक्षणात अडथळा निर्माण झाला. विद्यार्थी शाळेत येणे बंद झाले. पर्यायाने शिक्षण प्रक्रिया खुंटली. मार्चपासून शाळा बंद झाल्या.

मे महिन्यात ऑनलाइन शिक्षणाची संकल्पना आली. झूम मीटिंग द्वारे विविध तंत्रस्नेही शिक्षकांची प्रशिक्षणे झाली. लातूर डायट मार्फत तंत्रस्नेही शिक्षकांना ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात आले. त्यात मीही प्रशिक्षण घेतले. डिजिटल साक्षर दीक्षा यासारखे प्रयत्न उदयास आले, ज्याद्वारे विद्यार्थ्यांचे शिकणे सोपे झाले. तंत्रस्नेही बनून विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी ५० वर्षे वयाच्या शिक्षकांनी सुद्धा हे तंत्रज्ञान शिकून घेतले. पूर्वी शिक्षकाकडे दोनच रंगाच्या वस्तू होत्या; एक काळा फळा व दुसरा पांढरा खडू. त्याच्या साह्याने शिक्षकाने अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात रंग भरण्याचे काम केले. सध्या तिसरे साधन आहे तंत्रज्ञान. घरी बसून मोबाईलच्या साह्याने ऑनलाइन झूम मीटिंग किंवा गूगल क्लासरूमच्या साह्याने विद्यार्थ्यांना शिकवण्याची प्रक्रिया जून महिन्यापासूनच मी सुरू केली आहे. पण सर्व मुलांकडे असे अँड्रॉइड मोबाइल नव्हते म्हणून काही मुले शिक्षणापासून वंचित राहत होती. गुरुकुलात शिक्षण देणारे गुरू व गूगल क्लासरूम द्वारे शिकवणारे गुरू काळाप्रमाणे बदलत आहेत.

पैसा कितीही असला तरी त्याला आपल्याला सांभाळावे लागते; पण ज्ञानाला आपल्याला सांभाळावे लागत नाही, ते आपल्याला सांभाळते! ते देण्याचे कार्य शिक्षक करतात म्हणून ते सर्वश्रेष्ठ आहेत. शिक्षण हे समाजाच्या गरजाभिमुख असते. पूर्वी गुरुकुलात गुरूकडे शिकण्यासाठी विद्यार्थी येत असत. काळ बदलला. मुले शाळेत येऊन शिकू लागली. आज समाजाची गरज वेगळी आहे हे ओळखून शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन शिक्षण देत आहेत. विद्यार्थ्यांना मार्गदर्शक बनून तळमळीने, आपुलकीने शिक्षण देणाऱ्या सर्व शिक्षकांना आजही समाजात तेवढाच मान मिळतो. मला व समाजाला घडवणाऱ्या सर्व आजी-माजी शिक्षकांना शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा.

**- सौ. सविता जयंतराव धर्माधिकारी**
जि.प.कें.प्रा.शा. कासारखेडा,
जिल्हा-लातूर
मो. नं. ९४२१३६९७३७

●●●

जो एक दिवस जे देतो; तो दुसरा दिवस घेऊन जातो!

# ओळख वनस्पतींची
# घाणेरा / नरक्या

*'घाणेरा / नरक्या' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, मानवी स्वभाव किती विचित्र आहे! गोड लागलं की अगदी मुळापासून उपटायचं ही त्याची वृत्ती अजूनही कधी कधी नजरेस येते. विशेषतः वनौषधींच्या बाबतीत तर याचा प्रत्यय नेहमीच येतो. वनौषधींची लागवड करण्याऐवजी जंगलामध्ये उपलब्ध असणाऱ्या वनस्पतींची इतकी कत्तल केली की त्या औषधी वनस्पती दुर्मीळ झाल्या किंवा कायमच्याच आपण गमावून बसतो. अशाच एका वनस्पतीच्या तस्करी संबंधी वर्तमानपत्रात बातमी होती. तस्करी करताना त्या वनस्पतींनी भरलेला ट्रक जप्त केल्याबद्दल वनअधिकारी तसेच पोलिस यांनी स्वतःची पाठ थोपवून घेतली. रोज असे किती ट्रक बिनबोभाट रवाना होत असतील हे ते फक्त नेणाऱ्यांनाच माहीत!



कर्करोगावर गुणकारी असणाऱ्या वनस्पतीच्या तस्करीबाबत अशीच एक बातमी वर्तमानपत्रात आली होती. सांगली जिल्ह्यातील चांदोली अभयारण्यातून (मे २००४ पासून या अभयारण्याला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा मिळालेला आहे.) या वनस्पती चोरून आणलेल्या होत्या. ही वनस्पती नेमकी कशी असते हे जाणून घेण्याची उत्सुकता होती. अनायासे ती संधी चालून आली. काही कामाकरिता सांगलीस गेलो होतो. थोडा वेळ होता व चांदोली अभयारण्यात त्यापूर्वी कधी गेलो नव्हतो. हे अभयारण्य गव्यांसाठी प्रसिद्ध आहे. आता हे टायगर प्रोजेक्ट म्हणून घोषीत झाले आहे. त्यात कोयना अभयारण्याचा भाग देखील समाविष्ट केला आहे. चांदोली अभयारण्य पाहतांना वाटाड्यास या तस्करी झालेल्या वनस्पतीबाबत विचारले. त्याला त्या वनस्पतीबद्दल काहीच माहिती नव्हती. अनायासे आम्हाला त्या भागातील एक खेडूत भेटला. त्याला त्या वनस्पतीची माहिती होती. बराच वेळ फिरल्यानंतर त्याने एक झुडूप दाखविले. त्यावर छान लाल तपकिरी रंगाची फळं आली होती. मी वाचले होते की, तो एक छोटेखानी वृक्ष आहे आणि हे तर चक्क झुडूप दिसत होते. पण खेडूताने अगदी खात्रीपूर्वक सांगितल्यामुळे मी त्या झाडाचे निरीक्षण करीत होतो. तेव्हा लक्षात आले की, येथे मुळात एक झाडच होते. ते तोडण्यात आले. आता आलेल्या व झुडुपाप्रमाणे दिसणाऱ्या फांद्या म्हणजे मूळ वृक्षाच्या कापलेल्या खुंटांमधील नवीन आलेले फुटवे होते. म्हणजे वृक्षतोडीचा साक्षात पुरावा माझ्या समोरच होता. हे झाड होते घाणेरा या नावाचे किंवा नरक्या नावाने प्रसिद्ध असलेल्या औषधी वनस्पतीचे.

घाणेरा किंवा नरक्या हे तीन ते आठ मीटर पर्यंत

वाढणारे लहान झाड आहे. राखाडी रंगाची, मऊ पोताची व वळ्या असणारी ५ मी. मी. जाडीची साल कोनाकृती फांद्याच्या टोकाशी गर्दी केलेली टोकेरी व थोडी मांसल पाने. पानांची रचना एकांतरीत व पानांचा आकार अंडाकृती पण टोकेरी. पानांची लांबी १५ ते २५ सें.मी. व रुंदी ४ ते १२ सें.मी. व ३ ते ६ सें.मी. लांब देठ असलेली. रंग गर्द हिरवा.

या झाडास ऑगस्ट-सप्टेंबर या महिन्यात पिवळसर रंगाची केसाळ फुले येतात. पाच पाकळ्यांच्या मध्यातून पाच टोपीधारी पुंकेसर बाहेर येऊन ते बाहेरच्या बाजूला वाकतात. फुलांचा व्यास साधारण ६ ते ७ मी. मी. एवढा. या फुलांना विष्टेसारखा घाणेरडा वास येतो. त्यामुळेच याचे नाव घाणेरा किंवा नरक्या असे पडले असावे. अर्थात सुगंध अथवा दुर्गंध या मानवी संकल्पना आहेत. निसर्गात केवळ गंध हीच संकल्पना मान्य आहे. प्रत्येक गंध वेगवेगळ्या किटकांना आकर्षित करीत असतो. विशिष्ट झाडावर विशिष्ट प्रकारचेच कीटक येत असतात व त्याद्वारे त्या झाडांच्या फुलांवर परागीकरणाची प्रक्रिया होऊन फळधारणा होते. हे विशिष्ट प्रकारचे कीटक त्या भागात नसतील किंवा नष्ट झाले असतील तर परागीकरणा अभावी त्या झाडावर फलधारणा होण्यास अडचणी येतात. उदा. व्हॅनिलाच्या फुलांचे परागीकरण मानवी कौशल्य वापरून करावे लागते. कारण त्याकरिता आवश्यक असणारे कीटक आपल्याकडे नाहीत.

नरक्याच्या झाडास नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये ३ सें.मी. लांबीची लालसर रंगाची लांबोळकी फळे येतात. या मांसल फळामध्ये एकच बी असते. या झाडाचे शास्त्रीय नाव आहे Nothapodytes Foetidus. ही झाडे भारतात सर्वच जंगलांत आढळून येतात. तथापि ईशान्य भारतात तसेच पश्चिम घाटात जास्त प्रमाणात आढळतात. कारण यास दमट हवामान व जास्त पाऊस पडणारे ठिकाण चांगले मानवते. या झाडामध्ये विविध औषधी द्रव्ये आढळून येतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या झाडामध्ये मिळणारे Camptothecin नावाचे अल्कलाईड हे कॅन्सरवरील अति महत्त्वाचे औषध आहे. स्तनांचा कॅन्सर, गर्भाशयाचा कॅन्सर व मणक्यांचा कॅन्सर इत्यादी आजारांवर उपयुक्त आहे हे सिद्ध झाले आहे. अर्थात हा विषय तज्ज्ञांचाच आहे.

या सर्व गुणविशेषांमुळे या झाडाच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. विविध औषध कंपन्यांकडून व प्रयोगशाळांकडून मागणी असल्याने, तसेच विदेशातून देखील मागणी असल्याने या झाडांची चोरून कत्तल केली जाते. हे प्रमाण एवढे वाढलेय की, जंगलात आता अभावानेच ही झाडे दिसतात. औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी शासनाच्या विविध योजना आहेत. त्याद्वारे औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी अनुदान मिळते. परंतु या वनस्पतीची लागवड न करता जंगलात आयतीच उपलब्ध असलेली झाडे तोडणे व विकणे जास्त सोपे व कमी खर्चाचे व कमी श्रमाचे असल्याने औषधांच्या व्यापाऱ्यांकडून तस्करीला प्रोत्साहन मिळते. व्यापाऱ्यांच्या या धोरणामुळे अनेक औषधी वनस्पतींवर संकट आले आहे. काही वनस्पती तर जंगलात आता दिसतच नाहीत. उदा. सर्पगंधा ही वनस्पती आता केवळ उद्यानामधूनच किंवा रोपवाटीके मधूनच दिसून येते. औषधी वनस्पतींच्या तस्करीस पायबंध न बसल्यास अशा कितीतरी वनस्पती आपण गमावून बसू व पुढील पिढीस त्या केवळ पुस्तकामधून किंवा छायाचित्रातूनच पाहता येतील.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी - ९८६९५४१९६६

•••

# गजेंद्र अहिरे दिग्दर्शित चित्रपट 'पोस्टकार्ड' : एक रसग्रहण

*गजेंद्र अहिरे यांनी दिग्दर्शित केलेल्या 'पोस्टकार्ड' या चित्रपटाचे रसग्रहण प्रा. श्रीपाद जोशी यांनी प्रस्तुत लेखात केले आहे - संपादक*

गजेंद्र आहिरे यांनी दिग्दर्शित केलेला पोस्टकार्ड हा मस्त चित्रपट बघितला. कुणीतरी कुणाची वाट बघणं, हुरहुरत राहणं तसं वाईटच. 'भेटीत तुष्टता मोठी' असं म्हणतात; पण भेटच होणार नसेल आणि झुरत राहावं लागणार असेल तर काय? एकेक क्षण, एकेक श्वास कुणाचातरी ध्यास घेऊन जगणारी लोक आपण अवतीभवती बघतोदेखील. हा ध्यास कधी लागतो? जेव्हा तुमचं कोणी जिव्हाळ्याचं असेल, प्रेमाचं असेल तेव्हा. 'पोस्टकार्ड' हा सिनेमा अशीच मनाची होणार गुंतागुंत मांडतो. भावनिक उद्वेगाला सिनेमारूपी कवितेतून गजेंद्र अहिरे प्रेक्षकांसमोर आणतात. ह्या सिनेमात दिलीप प्रभावळकर, किशोर कदम, सई ताम्हणकर, गिरीश कुलकर्णी, राधिका आपटे, प्रवीण तरडे, सुबोध भावे, विभावरी देशपांडे, वैभव मांगले या अभिनेत्यांनी उत्तम काम करत एक छान कलाकृती समोर ठेवली आहे.




वेठबिगारी वाईटच. कायदे होऊनही बोन्डेड लेबरिंग आज थोड्याफार प्रमाणात कुठे ना कुठे होताना दिसतेच. थकलेला, पिचलेला आणि गांजलेला; वखारीत लाकडं तोडणारा भिकाजी कोंडिबा काळे हा म्हातारा ज्याला आपल्या घरी जाण्याची, बायका-पोरांत आणि नंतर उत्तरआयुष्य सुखात दिवस घालायची अभिलाषा आहे. तो आपल्या बेरकी मालकाकडे जातो व 'माझा हिशोब करा व इतकी वर्षे काम केल्यानंतर जमा झालेली रक्कम परत करा' म्हणून मालकाकडे जातो, तेव्हा क्रूरपणे त्याचा मालक त्याला '१०००/- त्या म्हाताऱ्यालाच फेडणे बाकी आहे' असं सांगतो. व्याज-चक्रवाढ व्याज आणि मोठ्या प्रमाणात होणारी फसवणूक यात अनेक पिढ्या गेल्या. म्हाताऱ्याची अगतिकताच नव्हे तर त्याची कामाप्रती आणि स्वतःच्या चारित्र्याप्रती असणारी निष्ठा दिलीप प्रभावळकर यांनी उत्तम पद्धत्तीने वठवली आहे. मुलं पैसे पाठवत नाहीत म्हणून देवाला पत्र लिहिण्याचा आणि पैसे मागण्याचा निरागसपणा त्याच्यात आहे. मालकाचे पैसे बुडवून पळून जाण्यात किंवा मरण्यात त्याला स्वारस्य नाही. तो शील जपणारा कामगार आहे. म्हणूनच लाकडं फोडून पैसे परत करायचा त्याचा दृढ निश्चय आहे. भावनिक पातळीवर या पात्राकडे बघताना अत्यंत क्रूरपणे निरागसता चिरडून टाकण्याची

जी मालकी पद्धत पिढ्यान्पिढ्या चालत आली आहे त्याकडेसुद्धा आपल्याला सिनेमा बघताना दुर्लक्ष करून चालणार नाही. वैभव मांगले यांनी त्या क्रूर मालकाची भूमिका तितक्याच ताकदीने समोर आणली आहे.

गिरीश कुलकर्णी ह्यांनी साकारलेला पोस्टमन हा कामाशी काम असणारा आणि भाबडेपण दाखवत नसलेला, तरी आपल्या अंतर्यामी असणारं सहृदय फुलू देणारा पोस्टमन आहे. म्हटलं तर पत्र पोहोचवणं हे एक फक्त काम. आणि म्हटलं तर केवळ ते काम उरत नाही. दोन जीवांच्या अंतर्यामी भावनांना पोहोचवण्याचं भाग्याचं काम. पोस्टमनची बायको (सई ताम्हणकर) ही पत्र आणि ते पोहोचवण्याचं काम या दोन्ही किती पवित्र गोष्टी आहेत याची जाणीव पोस्टमनला करून देते.

सिनेमा केवळ एकाच कथेभोवती फिरत नाही. तीन वेगवेगळी पात्रं त्यांच्या आयुष्यात पत्र न पोहोचल्याने व्यथित असतात. काळ सरकतो तशी व्यथा संपते का? की ती असते आत खोलवर ? ती जखम भळभळते? आणि कधी? हे सिनेमात नक्की बघायला हवं.

१००० रुपयाची गरज असलेल्या भिकाजीची देवावरची श्रद्धा तुटू नये म्हणून पोस्टमनची बायको स्वतःची ७०० रुपयांची बचत स्वतःच्या नवऱ्याकडे सुपूर्त करते व हे पैसे 'त्या आजोबांना द्या' असे म्हणते तेव्हा देवपण आणि माणूसपण ह्या वेगळ्या गोष्टी नसून एकच आहेत ही गोष्ट अधोरेखित होते. भिकाजीचं ३०० रुपयांचं देणं आणि स्वतःच्या कुटुंबाला न भेटताच अकाली निघून जाणं जीवाला चटका लावून जातं.

सिनेमा तीन कथांभोवती फिरतो. पण तिन्ही कथांची गुंफण पोस्टमनच्या माध्यमातून दिग्दर्शकाने अत्यंत हुशारीने केली आहे. चित्रपटाच्या फ्रेम्स खूप सुंदर आहेत. जुन्या इंग्रजकालीन इमारती व परिसर दाखवून चित्रपटाची शोभा आणखी वाढली आहे. त्यासोबतच 'गुलजार' नावाच्या स्त्रीच्या कथेमध्ये दाखवलेला माळरानसुद्धा चित्रपटाचा एस्थेटीक टिकवतो.

दुसरी कथा फिरते लिझा आणि जेम्स कांबळे या दोन पात्रांभोवती. पूर्वी म्हटल्याप्रमाणे पोस्टमन हा या सिनेमातल्या तिन्ही कथांचा दुवा आहे. तो या पात्राच्या आयुष्यात भावनिकरित्या सहज गुंतून जातो. म्हणूनच जेम्स या सैनिकाने त्याच्या लहान शाळकरी मुलीला लिझाला लिहिलेली  आणि न पोचलेली पत्रं जाळणारा पोस्टमन त्यांच्या आयुष्याच्या घटनांत ओढला जातो. जेम्स कांबळे या सैनिकाची भूमिका किशोर कदम यांनी अप्रतिमरित्या साकारली आहे. सैनिकाची अवधानता आणि आपल्या मुलीला भेटू न शकणाऱ्या पित्याची अगतिकता किशोर कदम यांच्या देहबोलीतून कमालीची प्रतीत होते. त्यांचं पोस्टमनला 'श्रीमान म्हणणं, अदबीने शाळेचं गेट उघडवून देणं, एक सैनिक असल्याने छाती ताणून आणि सावधान उभं राहणं खूपच आवडून जातं. अभिनय करताना पात्र समजून घेणं आणि पात्रात घुसणं काय असतं ते किशोर कदम यांच्या भूमिकेकडे बघून लक्षात येतं. लिझा आणि तिचे वडील जेम्स कांबळे आयुष्यात एकमेकाला का भेटू शकत नाहीत? काय कहाणी आहे त्यांची? पोस्टमन तिची जेम्सच्या मृत्यूपश्चात कशी भेट घडवून आणतो? लिझाचे पाश कसे तुटतात? ती बंधमुक्त कधी होते? हे सगळं समजून घेण्यासाठी हा सिनेमा नक्की बघा.

तिसरी कथा आहे 'गुलजार' नावाच्या मुलीची. जिचं तिच्या प्रियकरावर निरतिशय प्रेम आहे. राधिका आपटे हिने गुलजार या मुलीची भूमिका साकारली आहे. तिच्या डोळ्यांत वाट बघणं आहे, झुरणं आहे आणि 'मेरे आँखो से आसू नहीं बहते' असं म्हणूनही तिच्या  डोळ्यांचं झरणंसुद्धा आहे. कोठ्यावर असणाऱ्या गुलजारचं 'बेबसपण' समोर येत राहतं. ती पोस्टमन

(पृष्ठ क्र.३३ वर)

# संगीत मनमोही रे
## भाग ३ : राग जाती आणि राग वेग

*'संगीत मनमोही रे' या संगीत विषयीच्या लेखमालेतील 'राग जाती आणि राग वेग' हा तिसरा भाग - संपादक*

वेद कालीन सामगायनाला 'देवलोकीचं संगीत' असं म्हटलं जायचं. पण हे संगीत धार्मिक कार्यात गायलं जात असल्यामुळे काही विशिष्ट वर्गापर्यंतच मर्यादित राहिलं. याच कालखंडात विविध लोकभाषेतील संगीत उदयास येत होतं. संगीत तज्ज्ञांनी यातील बारकाव्यांचा अभ्यास करून प्रचलित केलेला 'जाती गायन' हा प्रकार १० व्या शतकापर्यंत भारतात प्रचारात होता. दुर्दैवानं या जाती गायनाचे संदर्भ आज विशेष उपलब्ध नाहीत. पण आजच्या भारतीय राग संगीताचा उगम या जाती गायनातून झाला असं मानलं जातं.

सात स्वरांच्या पासून झालेल्या रागांच्या तीन प्रमुख जाती म्हणजे 'औडव', 'षाडव' आणि 'संपूर्ण' राग हे मागच्या भागात आपण पाहिलं. हिंदुस्थानी संगीतातले अनेक राग आणि त्याचे दहा थाटात वर्गीकरण करण्याचं अत्यंत अवघड काम कै. पंडित भातखंडे यांनी केलं. पण जशा शास्त्रीय प्रयोगात त्रुटी असतात तशाच त्रुटी या राग वर्गीकरणात पण आढळतात. राग वर्गीकरणाचा अभ्यास महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध प्रतिभावान संगीत तज्ज्ञ, नाटककार, नट आणि कला व्यासंगी कै. गोविंदराव टेंबे यांनी पण केला आणि कल्पना संगीत या ग्रंथातून मांडला. या ग्रंथामध्ये राग वर्गीकरण करताना रागाच्या १५ जाती मानल्या आहेत. तीव्रा, मृदुला, महा, महानना, राधा, राधानना, मधुर, धरणी, रक्ता, राती, मंगला, मगध, मानी, गंगामनना आणि रममाण अशी त्यांची नावे दिली आहेत.

या संगीत लेखमालेत, जाती रागाच्या या आधारावर काही रागांची माहिती, त्यातील काही आठवणीतील गाणी यांचा उल्लेख आणि मनाची उजळणी करून घेऊ. कारण शास्त्र समजण्यापेक्षा बरेच वेळा संगीत आपल्या आठवणीतून मनाशी संवाद साधतं.

गोविंदराव टेंबे यांनी दिलेल्या १५ राग जातीं पैकी, तीव्रा जाती मधील महत्त्वाचे राग म्हणजे भूप, शुद्ध कल्याण, यमन किंवा कल्याण, शंकरा, हिंडोल, जैत कल्याण आणि श्याम कल्याण.

'सा रे ग प ध सा' या पाच शुद्ध स्वरांच्या भूप रागानं बरेच वेळा संगीत शिकायची सुरवात होते, 'गाईये गणपती' ही भूप रागातील बंदिश शिकून आपल्या पैकी अनेकांनी संगीताचा श्री गणेशा केला असणार. हा दिसायला साधा सोपा राग; पण बैठकीत गायचा म्हटलं तर आव्हानच असतं. भूप रागाचं चलन नावाप्रमाणेच एखाद्या राजाला शोभावं असं धीर गंभीर पण प्रसन्नतेचा शिडकावा करणारं. पण एखादा प्रतिभावान कलाकार या पाच शुद्ध स्वरांतून पण ललित गंभीर, बेचैन करणारं रूप पकडू शकतात ! याचं उत्तम उदाहरण म्हणजे किशोरीताई आमोणकर यांनी गायलेली भूप रागातील 'सहेला रे, आ मिल जा' ही बंदिश !

भूप रागातील धैवाताचा लगाव थोडासा बदलला की याच स्वरातून खुलतो तो प्रसन्न राग म्हणजे देसकार. ''घनश्याम सुंदरा, उठा उठा हो सकळीक, उठी श्रीरामा, उठी उठी गोपाळा, ज्योती कलश छलके, प्रभात समयो पातला, प्रभाती सूर नभी रंगती, पहाटेच्या या प्रहरी म्हणा हरी हरी'', अशा आपण प्रात:काली गुणगुणतो

त्या कितीतरी भूपाळ्या भूप देसकार या प्रसन्न रागात स्वरबद्ध झाल्या आहेत. भूपाळी वाटावं असं नाट्यगीत 'जयोस्तुते उषा देवते' पण याच स्वरातलं. 'ओंकार प्रधान रूप गणेशाचे, अबीर गुलाल, माझे माहेर पंढरी, विजय पताका श्रीरामाची, विठ्ठला मीच खरा अपराधी, खेळ मांडियेला' अशा भक्ती संगीतात नाहून काढणारा भूप राग, 'ऐरणीच्या देवा तुला' मधल्या चित्रपट संगीतात तर कधी 'प्रिये पहा, सुकांत चन्द्रानना' या नाट्यगीतांत पण अचानक भेटतो. लक्षपूर्वक ऐकलं तर कळेल की अनेक चिनी चित्रपटांत, तसेच त्यांच्या प्रार्थनास्थळी भूप देसकार धून वाजत असतात. भूप देसकार या जोडगोळीला चिनी संगीतात पण खूप मागणी आहे. मात्र या जोडगोळीचा गायन वादनाचा प्रहर नक्की कोणता या बाबतीत विद्वान मंडळींमध्ये विचारभिन्नता आहे. पण एकदा का भूप रागाचे स्वर कानावर पडले, की या विचारभिंती गळून पडतात. भूप नेमका सापडतो तो, 'माझे जीवन गाणे' या गीतातून! हे गीत म्हणजे कविवर्य मंगेश पाडगांवकर यांचे शब्द, पु. ल. देशपांडे यांचं संगीत आणि पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या स्वरांचा त्रिवेणी संगम ! या गीताच्या शब्दाप्रमाणे राग भूप –

'व्यथा असो, आनंद असू दे ,
प्रकाश किंवा तिमिर असू दे ,
वाट दिसो अथवा न दिसू दे ,
गात पुढे मज जाणे'

असं म्हणत आपली मनमोही वाट चालतच असतो. हाच या रागाचा स्थायीभाव मनात रेंगाळत राहतो !!

(क्रमशः)

**– डॉ. कीर्ती आगाशे**

पी एच डी इलेक्ट्रोनिक्स / संगीत विशारद

•••

(पृष्ठ क्र. १४ वरून - **डॉ. शेखर बसू : अणुइंधन पुनर्चक्रण पूर्णत्वास नेणारे अणुशास्त्रज्ञ**)

भाभा अणू संशोधन केंद्राचे संचालक असताना विशेष पुढाकार घेऊन त्यांनी अणुकृषी, अणुसहाय्यित अन्न टिकवणे (फूड प्रिझर्व्हेशन) आणि अणुवैद्यक ह्या अणुविभागाच्या सामाजिक कार्यक्रमांचा विस्तार केलेला आहे. अणुइंधन समृद्धी आणि व्यूहरचनात्मक कार्यक्रमांच्या विस्तारावरही त्यांनी कार्य केलेले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांनी स्वावलंबी भारताची घोषणा केलेली आहे. अणुऊर्जा; अण्वस्त्रसज्जता; अणुविज्ञानाच्या साहाय्याने कृषी, अन्नप्रक्रिया आणि वैद्यक; ह्या क्षेत्रांत संपूर्ण स्वदेशी तंत्रसामर्थ्य निर्माण करून, भारत आज स्वावलंबी झालेला आहे. ज्या सगळ्यांमुळे हे सारे संभव झाले त्यांत डॉ. बसूंचे नावही अग्रेसर आहे. २० सप्टेंबर रोजी येत असलेल्या त्यांच्या जन्मदिनी, भारतातील ह्या आघाडीच्या अणुशास्त्रज्ञास सादर प्रणाम!

**संदर्भः**

१. भाभा अणु संशोधन केंद्राच्या संकेतस्थळावरील डॉ. शेखर बासू ह्यांची माहिती http://www.barc.gov.in/leaders/sbasu.html

२. २०१४०३०४१२ क्रमांकाचे बी.ए.आर.सी.न्यूज लेटर http://www.barc.gov.in/publications/nl/2014/2014030412.pdf

**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# आ बैल मुझे मार
# युरोपातील मुस्लिम स्थलांतरीत

*नुकत्याच स्वीडन येथे झालेल्या हिंसाचाराबद्दल जागतिक स्तरावर स्थलांतरितांच्या प्रश्नावर बराच ऊहापोह सुरू आहे. या विषयाचे बारकाव्याने निरीक्षण प्रस्तुत लेखात डॉ. प्रमोद पाठक यांनी मांडले आहे - संपादक*

दि. २८ ऑगस्ट. २०२० ला ऐन शुक्रवारी मालमो, स्वीडन येथे तथाकथित उजव्या विचारसरणीच्या लोकांनी मुस्लिम बहुल वस्तीच्या शेजारी कुरआन शरीफची प्रत उघड्यावर जाळली. त्यांच्या विचारसरणीचा पाठीराखा असलेल्या रासमुस पालुदान या नेत्याने स्वीडनमध्ये येऊ नये यासाठी मुस्लिम स्थलांतरितांनी निदर्शने केली. ती हिंसक झाली नसती तरच नवल ठरते. सुमारे तीनशे मुस्लिम बुरखाधारी तरुण प्रदर्शनकारी अवघ्या काही मिनिटांत मुख्य रस्त्यावर जमले. त्यांनी रस्त्यावर टायर-मोटरी जाळल्या, दुकाने फोडली. सर्व कसे अपेक्षित घडले. दुसऱ्या दिवशी ओस्लो येथे प्रदर्शन करणाऱ्या स्थलांतरितांनी पोलिसांच्या गाड्यांवर हल्ले केले. प्रदर्शन करणाऱ्या मुस्लिमांच्या समोरच एका महिलेने त्यांचा निषेध करत कुरआन शरीफची पाने फाडली. त्यामुळे तर प्रदर्शनकारी अधिकच चेकाळले. प्रदर्शनांचे लोण स्वीडनच्या प्रशासनाने इतरत्र पसरू दिले नाही. इथे एक प्रथमच स्पष्ट केले पाहिजे की, प्रत्येक धर्माच्या अनुयायांना त्यांच्या धर्मग्रंथाचा आदर राखला जावा असे वाटणे साहजिक आहे. तसे व्हायला पाहिजे. त्यामुळे कुरआन शरीफ जाळणे अथवा फाडणे हे निंदनीयच ठरते. मी स्वत: माझा निषेध नोंदवतो.

इथे प्रश्न उद्‌भवतो की, भावनांचा आदर राखण्याची मक्तेदारी फक्त गैर मुस्लिमांसाठीच आहे काय ? मुस्लिम समाजावर त्याच तऱ्हेने इतर समाजांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक भावनांचा आदर करण्याची जबाबदारी नसते का? अगदी हाच प्रश्न युरोपमधेच नाही तर भारतातल्या गैर-मुस्लिम समाजांसमोर आहे. बंगळुरूला पै. महंमदांच्या संदर्भात केलेल्या विधानामुळे हिंसक हल्ले आणि जाळपोळीची घटना थेट मालमोच्या प्रमाणेच घडली होती. त्यानंतर ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात एका मुस्लिम युवतीने हिंदू देवतांच्या संदर्भात केलेल्या आक्षेपार्ह विधानांच्या विरोधात हिंदुंनी तक्रार नोंदविली. कुठेही जाळपोळ, दंगा झाला नाही. हेच बंगळुरू किंवा मालमो आणि ऑस्लो येथेही का घडले नाही? या मागची मुस्लिम मानसिकता ना हिंदुंनी ना युरोपातील देशांनी जाणण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

### इस्लाममधे धर्मनिंदेची शिक्षा

अगदी क्षुल्लक कारणांवरून कोणत्याही ठिकाणचा, विशेष करून तरुण, मुस्लिम हिंसा करण्यावर का उतरतो याचे कारण थेट पैगंबरांच्या मदिनेतील वास्तव्याच्या काळापर्यंत जाते. पै. मुहंमद आणि त्यांच्या अनुयायांना मक्केतील वास्तव्या दरम्यान सामाजिक संघर्ष, बहिष्कारा बरोबरच छळाला सामोरे जावे लागले. शेवटी त्यांनी मदिनेला पलायन - हिजरा करण्याचा निर्णय घेतला. त्या छळाची जाणीव अगदी आज पर्यंतच्या मुस्लिम समाजात खदखदत ठेवली गेली. ज्याप्रमाणे येशू ख्रिस्ताच्या वधासाठी ख्रिश्चन समाज ज्यू लोकांना जबाबदार धरून गेली शेकडो वर्षे त्यांच्या वस्त्यांवर जीवघेण्या हल्ल्यांची सत्रे (Pogroms) चालवत आला थेट तसाच प्रकार मुस्लिम समाज गैर-मुस्लिम, काफिरांच्या संदर्भात करत आला आहे. त्यासाठी खऱ्या खोट्या ईशनिंदेच्या घटनाच नव्हे; तर बिनबुडाचे आरोप

सुद्धा त्याला कायदा हातात घेण्यास प्रवृत्त करतात.

मदिनेला प्रस्थापित होण्याच्या दरम्यान सशस्त्र संघर्षात मुसलमानांना बद्रच्या लढाईत प्रथम विजय मिळाला. त्यानंतरही पै. मुहंमदांच्या विरोधात उभे राहणारे काही लोक होतेच. त्यांचा विरोध मोडून काढण्यासाठी जे जालीम उपाय पै. मुहंमदांच्या संमतीने अमलात आणण्यात आले ते इथे The Life of Muhammad, bo. Muhammad Husayn Haykal आवृत्ती क्र. ८ मधून दिले आहेत.

मदिनेचा एक नागरिक अबु अफ्क हा कवी होता. तो प्रथमपासून पै. मुहंमद आणि इस्लामचा टीकाकार होता. त्याने बद्रच्या विजयानंतर आपले टीकास्त्र थांबवावे असे अपेक्षित होते. तसे घडले नाही तेंव्हा पै. मुहंमदांचा अनुयायी सालिम इब्न उमयरने त्याचा आवाज बंद पाडण्याची कामगिरी स्वीकारली. अबु अफ्क त्याच्या स्वत:च्या अंगणात झोपेत असताना सालिमने त्याचा खून केला. दरम्यान मरवानची मुलगी अस्मा ही देखील पै. मुहंमदांच्या विरोधात कविता करत असे. तिला लहान मुले होती. तिचा आवाज बंद पाडण्यात उमयर इब्न अफ्क याने पुढाकार घेतला. अस्मा आपल्या बाळाला रात्री जवळ घेऊन झोपली असता उमयरने तिच्या बाळाला बाजूला करून तिला ठार मारले. तसेच, काब इब्न अल अश्रफ हा एक विरोधक बद्रच्या विजयानंतर मक्केला पळून गेला. तिथे त्याने पै. मुहंमदांच्या विरोधात कविता प्रसृत करायला सुरवात केली. त्याचा नायनाट करण्यासाठी पै. महंमदाचा अनुयायी अबु नैला तयार झाला. तो अमलात आणण्यासाठी पैगबरांची निंदानालस्ती करण्याची परवानगी मागून घेतली. त्या नंतर त्याने मक्केला जाऊन काबचा विश्वास संपादन केला. अबुने काब कडून पैसे उधार मागण्यासाठी त्याला घराबाहेर बोलावले. त्याला बोलण्यात गुंतवून दूर नेले. नंतर मित्रांच्या मदतीने अबु अफ्कने तलवारींनी त्याचा खून केला. हे करताना ‘देवशत्रूला मारून टाका’ असे अबुने त्याच्या मित्रांना सांगितले (चरित्र पृ. २४३-२४४).

काही वर्षांनी पै. मुहंमदांचे लष्करी सामर्थ्य वाढले. त्यांनी मक्केवरस्वारी केली. विजय मिळविला. त्यावेळी जे शरण आले त्यांनी धर्म स्वीकारताच त्यांना माफी करण्यात आली. अब्दुल्ला इब्न अबु अल सर्ह आणि अब्दुल्ला इब्न खतल या दोघांनी पूर्वी इस्लाम स्वीकारला होता. नंतर ते फिरले. त्यांनी पैगंबरांचा विरोध सोडला नाही. अब्दुल्ला इब्न खतलने आपल्या दोन दासींनाही गाण्यांमधून पैगंबर विरोध करण्यास आज्ञा दिली. तेंव्हा दासींसकट त्यांची कत्तल करण्यापूर्वी एक दासी पळून गेली होती. तिला पकडून आणल्यावर तिने माफी मागितल्यावर तिला सोडण्यात आले (चरित्र पृ. ४१०-४११). तिने इस्लाम स्वीकारला का याची माहिती हायकलने जरी दिली नसली तरी तिने धर्म स्वीकारला असण्याची शक्यता अधिक आहे. प्रारंभीच्या काळात अनुयायी वाढविणे हे धोरण असल्याने त्याला अनुसरून तिला सोडले असावे. या घटना लक्षात घेता अगदी प्रथम पासून पै. मुहंमदांची निंदा आणि इस्लामला विरोध या संदर्भात मुस्लिमांमध्ये आंत्यतिक अतिरेकी भावना निर्माण झाल्या. तेव्हापासून ईशद्रोह (Blasphemy), पैगंबरद्रोह आणि धर्मनिंदा करण्याऱ्यांच्या हत्येचा पायंडा तसाच सुरू राहिला आहे. कुरआन शरीफच्या प्रारंभाच्या काळापासून सर्वसामान्य मुस्लिमांच्या संकल्पना अश्मीभूत (fossilized) झाल्या आहेत. हे जगाने, विशेष करून अरबी वसंत, खरेतर उन्हाळा आणि अबु बक्र बगदादीच्या खिलाफत कारकिर्दी दरम्यान अनुभवले आहे.

या उलट युरोपच्या बाबतीत दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमध्ये सामाजिक आणि मानसिक बदल घडून आला. त्यातून ख्रिश्चन धर्मविचार आणि धर्मसंबंधी अतिरेकी

भावनांच्या उद्रेकांवर बंधने आली. धर्माचे बाह्य प्रदर्शन त्याज्य ठरले. विशेष करून स्कँडेनेव्हिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वीडन, नॉर्वे, फिनलँड आणि डेन्मार्क या देशांमध्ये तर धर्माचा पगडा अजिबात नष्ट झाला. त्याचवेळी या देशांमधील प्रशासकीय व्यवस्था अत्यंत प्रगत झाली. जगातील संपन्न देशांत त्यांची गणना होऊ लागली. या देशांमधील गुन्हेगारी अत्यंत कमी झाली. नागरिक मुक्त विचारांना समजून घेऊन विचारस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते झाले. या देशांमधून मुस्लिम लोकसंखा नगण्य होती याचीही नोंद घेतली पाहिजे.

**निर्वासितांचा भार**

युरोपातील पुनरुज्जीवनाचे मूळ एकेकाळी प्रगत असलेल्या मुस्लिम देशांबरोबर झालेल्या संपर्कात होते. त्यांची क्रुसेड धर्मयुद्धे इस्लाम विरोधात होती. युरोपातील देशांनी आफ्रिकेतील अनेक देशांवर राज्य केल्याने आफ्रिकेतील मुस्लिम काही पिढ्यांपासून युरोपमध्ये स्थायिक होत आले आहेत. युरोपला इस्लाम अनोळखी नव्हता. २०११ मधे सुरू झालेल्या अरब देशांतील हुकुमशाही राजवटींच्या विरोधातील संघर्षांचे ओझे युरोपवर पडण्यास सुरवात झाली. मुस्लिम देशांतील अशांततेची झळ युरोपातील देशांना अधिक लागली. या देशांमधून लाखोंच्या संख्येने शरणार्थी विशेषकरून भूमध्यसमुद्र, इटली, ग्रीस, तुर्कस्थान मार्गे युरोपात घुसू लागले. कसेही करून युरोपात प्रवेश मिळाला की जीवन स्थिर होईल याची शाश्वती या लोकांना होती. दुसऱ्या महायुद्धात पोळलेल्या युरोपातील देशांनी शरणार्थी लोकांचे हाल अनुभवले असल्याने त्यांनी मुस्लिम शरणार्थींचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले. त्यांची निवारा आणि निर्वाहाची व्यवस्था केली. नॉर्वेच्या पंतप्रधानांनी आपले घर शरणार्थींसाठी खुले केले. युरोपातील सरकारे एकत्र आली. त्यांनी जर्मनीच्या एँजेला मेर्केल यांच्या पुढाराला मान्यता देऊन शरणार्थींना देशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सामावून घेण्याचे प्रयत्न केले. युरोपीअन युनियनने शरणार्थींच्या मदतीसाठी शेकडो कोटी डॉलरची मदत देऊ केली (टा. ऑफ इंडिया २४ सप्टें. २०१५). ते पाहून इतर अतिरेकग्रस्त मुस्लिम देशांमधून शरणार्थींचे लोंढे युरोपकडे वळू लागले. सप्टेंबर २०१५ पर्यंत शरणार्थींच्या प्रश्नाने युरोप समोर अक्राळविक्राळ स्वरूप धारण केले होते. एका बातमी प्रमाणे दर तासाला एकट्या जर्मनीत १०० शरणार्थी घुसत होते. जर्मनीने ठरविलेली ८ लाखांची शरणार्थी संख्या केव्हाच ओलांडली गेली होती (द हिंदू ३ सप्टें २०१५). त्याचवेळी गुन्हेगारीचे प्रमाण एकाएकी वाढले. शरणार्थींना खुले आवतण देऊन काही महिन्यांत युरोपची स्थिती 'आ बैल मुझे मार' अशी झाली. शरणार्थींना सामावून घेणारी यंत्रणा पार कोलमडून गेली. डच जनतेने शरणार्थी विरोधात हिंसक निदर्शने केली (दि. हिंदू १८ डिसें.२०१५). फ्रांसमधे शरणार्थी नकोत अशी निदर्शने झाली (इंडि. एसक्स्प्रेस ३१ डिसें २०१६). अत्यंत उदारपणा दाखवणाऱ्या स्वीडनने शरणार्थींच्या बाबतीत पुनर्विचार केला (दि. हिंदू २६ फेब्रु.२०१७). एकट्या सिरियामधून ४० लाख विस्थापित शरणार्थी झाले (दि हिंदू १० जुलै २०१५) तर इराक मधून शरणार्थींची संख्या ३२ लाख होती (दि हिंदू २६ सप्टें. २०१५). यात जसे सुखरूपपणे युरोपला पोहचणारे शरणार्थी होते तसेच विशेष करून भूमध्य समुद्राच्या खवळत्या पाण्यात जलसमाधी मिळणारे दुर्दैवी पण होते. सप्टेंबरच्या २०२०च्या बातमीनुसार युरोपातील अनेक देशांत मुस्लिम शरणार्थींची टक्केवारी ८-१०%वर पोहोचली आहे. युरोपातील शरणार्थींची संख्या आतापर्यंत दोन कोटींच्या घरात पोहोचली असा प्रस्तुत लेखकाचा अंदाज आहे.

**आयसिसचा धुमाकूळ**

अमेरिका आणि युरोपातील देशांनी अरब देशांतील हुकुमशहांना हुसकावून तर लावलेच पण

नंतरची व्यवस्था लावण्यात ते अपुरे ठरले. त्यांचे मुस्लिम समाजमनाचे आकलन अपुरे पडले. त्यांनी मोकाट सोडलेल्या हुकुमशहांच्या सैनिकी जत्थ्यांमधून आयसिस आणि अबु बक्र बगदादीच्या खिलाफतीचा उदय झाला. खिलाफतीच्या उदयाने युरोपातील शरणार्थी समस्येने अधिकच अक्राळविक्राळ स्वरूप धारण केले. हे कमी होत नाही तो आयसिस आणि खिलाफतीमुळे युरोपमधील मुस्लिमांचे डोके फिरले. पिढ्या दोन पिढ्यांपासून युरोपमधे स्थिरावलेल्या मुस्लिमांची तरुण पिढी बगदादीच्या आवाहनाने हुरळून गेली. युरोपातील जवळपास सर्वच देशांमधून हजारोंच्या संख्येने तरुण-तरुणी हरप्रकारे प्रयत्न करून आयसिसला जाऊ लागले. त्यांना कसे परावृत्त करावे ही समस्या युरोपला भेडसावू लागली (टा. ऑफ इंडिया १४ जाने २०१५). याच्या पुढची पायरी आयसिसच्या प्रचारयंत्रणेने भारून जाऊन युरोपातच घातपाती कृत्ये करण्यासाठी शेकडो मुस्लिम तरुण सरसावले. कधी एकांडा शिलेदार, तर कधी अनेकांनी एकत्र येऊन कट करून मोठे हल्ले करण्याचे सत्र युरोप, अमेरिकेत सुरू झाले. शार्ली हेब्दो या नियतकालिकावर ७ जाने. २०१५त झालेल्या अतिरेकी हल्ल्यात तेथील चार व्यंगचित्रकार बळी पडले. फ्रान्स मधे नाईसला एका ट्रक ड्रायव्हरने मुख्य रस्त्यावर भर गर्दीत ट्रक घुसवून अनेकांचा बळी घेतला. अशा वाहन बळींची दिनांक-वार यादी टा. ऑफ इंडियाने दिली होती (दि. १६ जुलै २०१६). एकट्या फ्रान्समधे दोन वर्षांत १४ अतिरेकी हल्ले होऊन त्यात २४० लोक मारले गेले (इंडि. एक्स्प्रस २ ऑ. २०१६) युरोपातील अतिरेकी हल्ल्यांची जंत्री खूप मोठी होते. मोठ्या प्रमाणावर अशा घटना घडू लागल्याने युरोपातील वातावरण गढूळ झाले. कोपनहेगन येथे ज्यू सायनेगॉगवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यात सुरक्षाकर्मी ठार झाला (टा. ऑफ इंडिया १६ फेब्रु. २०१५). त्यामुळे वैतागून डेन्मार्कचे पंतप्रधान हेले थॉर्निंग-श्मिड्ट यांनी We are not in the middle of the battle between Islam and theWest. It's not a battle between Muslims and Non-Muslims. It is a battle between values based on the freedom of the individual and the dark ideology (Ind. Express 17 Feb 2016) काढलेले उद्गार,एकंदरच युरोपातील जनमानसाचे प्रतिबिंब होते. यात सुद्धा मध्ययुगात रुतून बसलेल्या इस्लामी जनमानसाचे अधुरे आकलन होते. कारण शार्ली हेब्दोवर झालेल्या हल्ल्याला डेन्मार्कमधे २००४ साली प्रसिद्ध झालेल्या पै. मुहंमदांची व्यंगचित्रे छापणाऱ्या नियतकालिकावर झालेल्या हल्ल्याची पार्श्वभूमी होती. त्याच चित्रांत भर टाकून शार्ली हेब्दोने व्यंगचित्रे छापली होती. युरोपातील राजकारणी २००४ सालच्या प्रसंगाने काही शिकले नाहीत. युरोपातील काही विचारवंत आणि लेखक या ओसंडून वाहणाऱ्या मुस्लिम शरणार्थींच्या लोंढ्यांचे दूरगामी परिणाम काय होतील याचा विचार करत होते. डग्लस मरेंने २०१७ साली शरणार्थी समस्येचे सांस्कृतिक आणि संख्याशास्त्रीय विश्लेषण करणारे The Strange Death of Europe: Immigration, Identity, Islam हे पुस्तक (पृष्ठे ३४३) लिहिले. मरेंने त्याच्या पुस्तकात ज्या महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला आहे त्यात शरणार्थींच्या संदर्भात जिनेवा कराराला धरून शरणार्थींना मिळणाऱ्या सोयी आणि सुविधांचा संदर्भ दिला आहे (पृ. ७१). शरणार्थींना मिळणाऱ्या सुविधांचा ते पुरेपूर उपभोग घेतात, पण त्यांनी जर शरण देणाऱ्या देशाचे नियम पाळले नाहीत तर त्याच्या विरुद्ध तोंड उघडणाऱ्यांवर मुस्लिम-द्वेषाचा (Islamophobia) शिक्का मारला जाई असे मरे लिहितो. केवळ आपल्याच देशातील राजकारणी अल्पसंख्यांकांचे लांगुलचालन करून देशद्रोही मागण्या करायला प्रोत्साहन देतात असे नव्हे, तर तिकडचे राजकारणी तेच करतात. डच न्याय मंत्री पिएत डोन्नर याने २००६ साली मुस्लिमांनी त्यांची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन, 'देशात शरीया लागू करण्याची मागणी करायला हरकत नाही' असे विधान

केले होते (पृ ९९). भोटपणे होणाऱ्या अशा मुस्लिमांच्या लांगूलचालना विरोधात तेथे २०१४ साली PEGIDA (People against the Islamisation of the Occident) चळवळ उभी राहिली. तिने अनेक ठिकाणी राजकारणात लगेच मूळ धरल्याचे निवडणूक निकालांवरून लक्षात येते (इंडि. एक्स्प्रेस ३० मे २०१६). याचे कारण शरणार्थी समाजात वेगाने प्रकट होणारे भारलेपण (Radicalization) आहे.

**मुस्लिम भारलेपणाचे मूळ**

गेल्या सात-आठ वर्षांत युरोप समोर एक मोठा सामाजिक प्रश्न उभा राहिला आहे. शरणार्थींची लोकसंख्या झपाट्याने वाढली. पश्चिमी युरोपातील उदारमतवादी देशांना कठोर होऊन त्यावर नियंत्रण ठेवता आले नाही. त्याची दोन प्रमुख कारणे आहेत. या देशांनी जिनेवा कराराची बूज राखली. हे करताना हृदय अति विशाल करण्याची चूक केली. त्याच वेळी हंगेरी, पोलंड इ. पूर्वाश्रमीच्या साम्यवादी देशांनी शरणार्थींना त्यांच्या देशात स्थिरावू दिले नाही. त्यांनी देशांच्या सीमांवर कुंपणे घातली (टा. ऑफ इंडिया १६ सप्टें २०१५). डेन्मार्कने शरणार्थींच्या जवळच्या मौल्यवान वस्तू जप्त करण्याचा आदेश काढला (दि हिंदू २८ नोव्हें २०१६). मोलमोच्या घटनेनंतर पोलंडच्या मंत्र्याने नि:संकोचपणे कबुली दिली की; त्यांच्या देशात जाळपोळ, लुटालूट इ. अतिरेकी घटना घडू देणार नाही. पश्चिमी युरोपातील देशांपुढे दुसरी मोठी सामाजिक समस्या अशी की, दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीतील मुस्लिम तरुण, जे युरापात जन्मले अथवा रुळले होते ते एकाएकी खिलाफतीच्या भावनेने कसे भारले गेले? युरोपातील अतिरेकी हल्ल्यांसंदर्भात ब्रुसेल्सच्या एका अभ्यास गटाने पहाणी करून काढलेल्या निष्कर्षानुसार, पाकिस्तानातील मुस्लिमांच्या भारलेपणाचे मूळ मदरशांमधून दिल्या जाणाऱ्या धार्मिक शिक्षणात आहे (टा. ऑफ इंडिया २७ सप्टें २०१६). जे पाकिस्तानात होते तेच युरोपातही घडत होते. अगदी लहानपणा पासून मुस्लिम मुलांच्या मनात गैर-मुस्लिमांच्या बाबतीत विखार भरला जातो. लंडनमधील सहा वर्षांचे मुस्लिम मूल गोऱ्या महिलांना वेश्या समजत होते (इंडि. एक्स्प्रेस दि. ९ ज्यून २०१४). नाईस, फ्रांस मधील एक ८ वर्षांच्या मुलाला शार्ली हेब्दोवरील हल्ल्याची वाखाणणी करताना पाहून पोलिसांनी त्याची उलटतपासणी केली होती (टा. ऑफ इंडिया ३० जाने २०१५). जी लहान मुले अशी विचार करतात त्यामागे त्यांच्या घरचे वातावरण आणि त्यांना मदरशांमधून दिले जाणारे शिक्षण असावे असा निष्कर्ष निघतो.

मुस्लिमांच्या भारलेपणाचे विश्लेषण करता असे दिसते की, घरातले धार्मिक वातावरण आणि मदरशांमधील शिक्षण लहानपणापासून त्यांना गैर-मुस्लिमांचा व्देष (Kafirophobia) करणे आणि अतिरेकी कारवायांसाठी प्रवृत्त करते. अन्यथा लहान मुले अशी व्देषपूर्ण मुक्ताफळे उधळणार नाहीत. दुसरी महत्त्वाची गोष्ट त्यांच्या मनावर ठसविली जाते की; ते काफिरांच्या देशात, दार उलहर्बमधे राहतात. त्यांनी एकतर दार उल इस्लाममधे गेले पाहिजे किंवा तो देश इस्लामी केला पाहिजे. याच दार उल इस्लाम विषयीच्या धार्मिक भावनाभरातून युरोपातील हजारो तरुण-तरुणींनी आयसिसला जाऊन मिळण्याचा आणि इस्लामी खिलाफतीत राहण्याचा मार्ग पत्करला. तो किती धोक्याचा आणि निष्फळ होता हे आता जे सुदैवाने जीवंत आहेत त्यांना लक्षात आले. भारतातही काही तरुण तिकडून परतले आहेत. युरोपसारख्या प्रगत देशांत राहूनही चौदाशे वर्षांपूर्वीच्या मानसिकतेतून हा समाज बाहेर पडू शकला नाही. त्यांना या दोन व्यतिरिक्त, सुखशांतीची भूमी, ‘दार उल अमन’ असू शकते, तिथे त्यांना त्यांचे धार्मिक जीवन निर्वेधपणे जगता येते याची कल्पना दोन पिढ्या घालविल्यावरही आत्मसात करता आली नाही. हे मुस्लिम

समाजाचेच नव्हे तर अखिल मानव समाजाचे दुर्दैव आहे. ती संकल्पना त्यांना यापुढे आत्मसात करावीच लागेल.

**स्थलांतरितांचे भावनिक आणि सांस्कृतिक पुनर्वसन**

युरोपातील देशांना इस्लामी अतिरेकाचा सामना २००४ साली करावा लागला. डेन्मार्क मधील एका वृत्तपत्राने पै. मुहंमदांची व्यंगचित्रे काढण्याचे निमित्त झाले आणि आगडोंब उसळला. त्याची झळ युरोपातील अनेक देशांना पोहोचली. खरे तर त्याच वेळी इस्लाम संदर्भात सामाजिक चिंतन होऊन पुढे जाऊन इस्लाम संदर्भात काय धोरण अंगिकारावे लागेल या बाबतीत सरकारी स्तरांवर आणि सामाजिक स्तरावर काय केले पाहिजे याचा विचार झाला नाही. लगेच सुमारे सहा वर्षांत अरब देशांतून अरबी उन्हाळी क्रांतीमुळे पोळलेल्या मुस्लिम स्थलांतरितांचा ओघ युरोपच्या दिशेने वाहू लागला. सिरियात क्रांती दरम्यान हुकुमशहा अस्सादने केलेल्या कत्तली, शहरांवरील नृशंसपणाने केलेले हल्ले यामुळे तर संपूर्ण युरोपमध्ये पळून येणाऱ्या स्थलांतरितांच्या बाबतीत सहानुभूतीचा पूर आला. लाखोंच्या संख्येने येणाऱ्या मुस्लिम स्थलांतरितांना सामुदायिकरित्या सामावून घेण्याची जबाबदारी युरोप समूहाने स्वीकारली. जर्मनीच्या चँसलर एँजेला मार्कर यांनी सर्वात जास्त म्हणजे आठ लाख मुस्लिम स्थलांतरितांना स्वीकारण्याची जबाबदारी घेतली. ती लगेचच ओलांडली गेली. ही जबाबदारी घेताना त्यांनी आपल्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना विचारले नव्हते असे बाहेर आले. इतकी मोठी जबाबदारी घेताना काय योजना कराव्या लागतील, मुस्लिम स्थलांतरितांना मुख्य प्रवाहात कसे सामावून घ्यायचे, त्यांच्याकडून काय वर्तणूक अपेक्षित असावी, या गोष्टी बिंबविण्याकडे दुर्लक्ष झाले. येणारे मुस्लिम स्थलांतरित आपले धार्मिक आणि सांस्कृतिक ओझे घेऊन येतील हे अत्यंत दुर्लक्षित झाले. ते कट्टर धार्मिकतेचे असतील हे लक्षात येऊन सुद्धा, स्थानिक सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी त्यांची मानसिकता तयार करणे यावर बोलणे म्हणजे निषिद्ध ठरले. स्थलांतरितांचे भावनिक आणि सांस्कृतिक पुनर्वसन करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन त्यांनी युरोपातील स्थानिक वातावरण आणि चालीरीतींना स्वीकारण्याची मानसिकता निर्माण करण्याकडे दुर्लक्ष केले गेले.

उलट मुस्लिमांना नको तेवढी सहानुभूती दाखवून त्यांच्या वेगळेपणाचे खापर स्थानिकांवर फोडण्याची टूम निघाली (इंडि. एक्स्प्रेस १६ आक्टो. २०१५) याचा परिणाम असा झाला क, आलेले मुस्लिम स्थलांतरित नव्या वातावरणाशी जुळवून न घेता मुस्लिम देशांत वागावे तसे स्वैरपणे वागू लागले. ज्या जर्मनीने त्यांना उदार होऊन आसरा दिला त्याच देशाच्या नववर्ष प्रसंगी स्थानिक जर्मन महिलांवर अतिप्रसंग करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. हे कोणता देश खपवून घेईल? यातूनच केवळ तीन वर्षात मुस्लिम स्थलांतरितांच्या विरोधात नवे राजकीय पक्ष उभे राहिले. त्यांना जनतेचे पाठबळ मिळते आहे. त्याचे प्रतिबिंब तथाकथित उजव्या विचारसरणीच्या लोकांनी कुरआन शरीफ जाळणे, फाडणे इ. घटनांमधून पडते आहे. ते स्वीकारार्ह नसले तरी नॉर्वे, स्वीडन सारख्या दोन-तीन पिढ्या पूर्णपणे सेक्युलर राहिलेल्या देशांमधे केवळ ३-४ वर्षांत का घडते आहे याचा विचार प्रथम तर तेथील प्रशासनाने आणि फार मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित झालेल्या मुस्लिमांनी केला पाहिजे.

**इस्लाम नव्या सामाजिक वास्तवाकडे?**

दि. २ सप्टेंबरला एक विस्मयकारक बातमी सर्व देशी-विदेशी वाहिन्यांवर प्रक्षेपित झाली. शार्ली हेब्दो नियतकालिकाने फ्रान्सच्या वैचारिक स्वातंत्र्याचा वसा पुढे चालवत तीच व्यंगचित्रे परत छापली. त्यावर मुस्लिम जगतातून काय प्रतिक्रिया उमटतात हे पाहणे महत्त्वाचे होते. आठवडा उलटून गेल्यावरही युरोप, तसेच इतर देशांमधे एकही अप्रिय घटना घडली नाही. फ्रान्सच्या

प्रमुख मौलवीने व्यंगचित्रांचे पुनर्मुद्रण विचारस्वातंत्र्य निदर्शक मानले. युरोपातील मुस्लिम तेथील वैचारिक स्वातंत्र्याची परंपरा शांतपणे अथवा केवळ निषेध करत स्वीकारण्याच्या मनःस्थितीत सध्यातरी झुकले आहेत हे दिसून आले. हे चांगले लक्षण आहे.

आता बदलत्या जगात युएई आणि हामाज हे परंपरागत शत्रू इस्रायलशी जर जुळवून घेणार असतील तर आश्रय देणारे देश दार उल अमन आहेत हे स्वीकारून, शरणार्थींना गुण्यागोविंदाने राहावे लागेल. त्यातून २०४७ पर्यंत इस्लामचे परिवर्तन होण्याची शक्यता निर्माण होईल. असे घडले नाही तर यापूर्वी काही देशांनी उपद्रवी शरणार्थींना त्यांच्या देशात परत पाठविले होते (टा. ऑफ इंडिया ४ आक्टो. २०१५). जर्मनीने (इंडि. एक्स्प्रेस २३ फेब्रु २०१७) आणि इस्रायलने आफ्रिकेतील ३८,००० शरणार्थींना त्वरेने हाकलण्यासाठी योजना तयार केली (द. हिंदू २७ जाने. २०१८). तसेच मोठ्या संख्येने मुस्लिमांना युरोपच्या भूमीवरून हाकलले जाईल. आपले भवितव्य कसे घडवायचे हे सर्वस्वी मुस्लिम शरणार्थींच्या हातात असेल.

युरोपमधे गुण्यागोविंदाने रहायचे असल्यास चौदाशे वर्षांपूर्वीच्या अश्मीभूत संकल्पना घेऊन जगता येणार नाही. नव्या युगाशी, वैचरिक स्वातंत्र्याशी जुळवून घ्यावे लागेल. मुस्लिम स्थलांतरितांना हे आचरणात दाखवावे लागेल. अन्यथा, ८०-८५ वर्षांपूर्वी हिटलरने जे ज्यूंच्या बाबतीत केले, आयसिसने जे गैरसुन्नी, कुर्द आणि यझदींच्या बाबतीत याच दशकात केले, सध्या उइघूर मुस्लिमांच्या बाबतीत चीनचे सरकार जे करते आहे, तेच दशकभरात युरोपात मुस्लिम स्थलांतरितांच्या बाबतीत घडले तर नवल वाटायला नको. भारतात तसे घडणार नाही. कारण तो हिदुंचा स्वभावधर्म नाही. बंगळुरूसारख्या घटनांनी ही दरी वाढीस लागणे हे सामजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने हितावह नाही. म्हणून भारतातील इस्लाम लगेच नाही, पण २०४७ पर्यंत कसा बदलला पाहिजे याचा विचार हिंदू आणि मुस्लिम दोघांनीही करण्याची ही वेळ आहे.

**- डॉ. प्रमोद पाठक**
८, वसुंधरा सहनिवास,
आयचित नगर, नाशिक ४२२०१३
भ्रमणध्वनी ९९७५५५९१५५
Email : drpvpathakyahoo.co.in

लेखक - डॉ. प्रमोद पाठक M. Tech. (Chemical Engg.) I.I.TMumbai आणि Ph. D (वैदिक साहित्य) आहेत. ते अमेरिकेत ह्युस्टन विद्यापीठात अभ्यागत प्राध्यापक होते. ते पर्यायी ऊर्जा तज्ज्ञ आहेत. वैदिक साहित्य, सिंधु संस्कृती, आणि इस्लाम धर्म आणि संस्कृती यावर त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे विविध विषयांवर वृत्तपत्रांतून लिखाण सातत्याने प्रसिद्ध होत असते.

●●●

---

(पृष्ठ क्र. ११ वरून - **मिखाईल गोर्बाचेव व साम्यवादी सोविएत संघाचे विघटन**)

राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांच्या क्रिमिया हा प्रदेश जिंकण्याच्या निर्णयाला त्यांनी पाठिंबा दर्शविला होता. आज वयाच्या ८९ व्या वर्षी गोर्बाचेव हयात आहेत.

**संदर्भ**

मॉडर्न वर्ल्ड हिस्ट्री : नॉर्मन लो
तिसरी क्रांती : अरुण साधू
सोव्हिएत साम्राज्याचा उदय आणि अस्त : गोविंद तळवलकर
पुतीन : महासत्तेच्या इतिहासाचे अस्वस्थ वर्तमान : गिरीश कुबेर

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

---

# 'मुहम्मद - अल - अमिली : एका अरबी कविची गोष्ट'

*मुहम्मद बहा अल दीन अल अमिली हा इराणमधील गणितज्ज्ञ, खगोलशास्त्रज्ञ आणि कवी होता. त्याच्या काव्यावर प्रकाश टाकणारा लेख - संपादक*

मुहम्मद बहा अल दीन अल अमिली - मला खात्री आहे की, आपल्यापैकी कुणीही हे नाव ऐकलेलं नाही.

तर ह्या अमिलीचा जन्म १५४७ चा. सध्याच्या लेबनॉन देशातल्या बालबेक गावातला. लहानपणीच ह्याच्या कुटुंबाने इराणमध्ये स्थलांतर केलं. अमिली हा त्याच्या काळातला मोठा गणितज्ज्ञ, खगोलशास्त्रज्ञ, आणि कवी होता. (सूर्य आपल्या ग्रहमालेच्या मध्यभागी असून बाकीचे ग्रह त्याच्याभोवती फिरतात हे मत त्याने कोपर्निकसच्या आधी मांडले होते असे काही संशोधकांचे मानणे आहे!) ह्या अमिलीने अरबी भाषेत बरीच यमककाव्ये - 'मसनवी' म्हणतात त्यांना - लिहिली आहेत. ह्यातले दोन प्रसिद्ध काव्यसंग्रह म्हणजे 'शीर ऊ शकर' (दूध आणि साखर) आणि 'नान ऊ हलवा' ('नान' म्हणजे आपण हॉटेलांत जाऊन खातो तोच नान आणि 'हलवा' म्हणजे गाजरहलवा मधला हलवा. अरबीत गोड पदार्थाला 'हलवा' म्हणतात. हा खायचा हलवा बरं का - 'जरा बूड हलवा' मधला 'हलवा' नव्हे!) ह्या कविता संग्रहांची नावं जरी खायच्या पदार्थांची असली तरी ती खायच्या पदार्थांबद्दल नव्हती. त्यातून धार्मिक उपदेश केलेले होते. इस्लामिक नियमांनुसार कसे वागावे - कसे रहावे - अल्लाचे स्मरण करत कसे आयुष्य कंठावे वगैरे साधे परंतु महत्त्वाचे उपदेश त्यांत आहेत. हा अमिली १६२१ मध्ये वारला. पण त्याचे काव्यसंग्रह मात्र इस्लामी देशांत बरेच प्रसिद्ध होते. त्याच्या पुढे अनेक नकला वगैरे बनल्या.



हे सगळं सांगायचं कारण म्हणजे, अमिली वारल्यानंतर सुमारे सत्तर वर्षांनी ह्याच 'नान ऊ हलवा' ची एक नक्कल मुघल साम्राज्यात १६९० मध्ये बनवण्यात आली. कुठे? तर आपल्या औरंगाबादमध्ये. हा काव्यसंग्रह कॉपी करून घेणारा कलाकार मात्र अज्ञातच आहे. ह्या अज्ञात दख्खनी नक्कलकाराने ही नक्कल उत्तम प्रकारे चित्रे वगैरे काढून सजवलेली आहे. अमिलीच्या ह्या काव्यसंग्रहात एक काव्य अमिलीने फकीरांना उपदेश करण्यासाठी लिहिलेले आहे. 'फकीरांनी फक्त नमाज पढावा - अल्ला त्यांना रोटी द्यायची चिंता करेल - कोणत्याही प्रकारे फकीराने काफिरांकडून (बिगर मुसलमानांकडून) रोटी घेऊ नये - त्याची शिक्षा मिळते' वगैरे संदेश देणारे हे एक काव्य त्यात आहे.

ह्या काव्याच्या पुढच्या पानावर आपल्या ह्या अज्ञात नक्कलकाराने जे भन्नाट चित्र काढलंय त्यात त्याने असं दाखवलंय की, एक फकीर अल्लाने रोटीची सोय करायची वाट न पहाता एका काफीराकडून रोटी

घेतोय. त्याबद्दल शिक्षा म्हणून एक रस्त्यावरचं कुत्रं त्याच्यावर ओरडून त्याला शिक्षा करतंय आणि ती रोटी त्याच्याकडून हिसकावून घेतंय. ह्या पानाच्या कडांवर सुंदर पक्षी वगैरे काढलेले आहेत. ह्या नक्षीत बागेत नेहेमी सहज दिसणाऱ्या पक्ष्यांबरोबरच इस्लामी कुराणांतील हुमा, अल बुराक वगैरे पक्षीही आहेत. ह्या चित्रातली सगळ्यात मोठी गंमत म्हणजे त्यात जो 'काफीर' दाखवलेला आहे तो काफीर दुसरातिसरा कोणीही नसून इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स आहे! दुसऱ्या चार्ल्सचे जॉन मायकल ब्राईट नावाच्या चित्रकाराने लंडनमध्ये १६६०-१६६५ मध्ये काढलेले चित्रही सोबत दिले आहे; त्यावरून कल्पना यावी की; आपल्या ह्या नक्कलकाराने दुसऱ्या चार्ल्सचा चेहरामोहरा, डोळे, मिशा आणि केसांचा विग वगैरे बऱ्यापैकी व्यवस्थित काढलेला आहे. (आणि ब्राईटच्या कलेलाही मानावेच लागेल. जर अगदी उशिराचं म्हणजे १६६५ मधलं त्याचं चित्र आहे असं मानलं तरी ते आपल्या शिवछत्रपतींना समकालीन आहे आणि आपल्या छत्रपतींचं ह्या प्रकारातलं एकही चित्र उपलब्ध नाही हे आपलं दुर्दैव!)

हा दुसरा चार्ल्स १६८५ मध्येच वारला. पण त्यानंतर पाचच वर्षांनी औरंगाबादसारख्या ठिकाणी आणि औरंगजेबाच्या दख्खन स्वारीच्या ऐन धामधुमीत इंग्लंडमधल्या दुसऱ्या चार्ल्सचे चित्र आपल्या ह्या नक्कलकाराला कसे आणि कुठे पहायला मिळाले हे मात्र एक नवलच आहे. आणि हीच इतिहासातली गंमत आहे!

**– संकेत कुलकर्णी**
लंडन

•••

(पृष्ठ क्र. २२ वरून – **गजेंद्र अहिरे दिग्दर्शित चित्रपट 'पोस्टकार्ड' : एक रसग्रहण**)

आला की, त्याच्याकडे धावतपळत सुटते आणि 'त्याचं' म्हणजे तिच्या प्रियकराचं म्हणजेच विश्वनाथचं 'पत्र आलं का' असं नेहमी विचारत असते. ही कथादेखील अशीच आहे, जिच्या नशिबी शोकांत आहे. गुलजारचा प्रियकर विश्वनाथ मशीनमध्ये पडून मरतो आणि स्वतःची सगळी मिळकत गुलजारच्या नावावर करून बंधमुक्त होतो. गुलजारच्या नशिबी कायमस्वरूपीचा विरह येतो.

भिकाजी काय किंवा जेम्स काय किंवा लिझा काय ही सारी पात्रं भावनेच्या अत्युच्च पातळीवर गुरफटलेले जीव. ह्या पात्रांचा भावनातिरेक झिरपत जातो पोस्टमनच्या आत; आणि पोस्टमन जगत जातो स्वतःभोवती दिसणारी, न दिसणारी ही अदृश्य पात्रं!

सर्व कलाकारांनी उत्तम काम केलं आहे. गजेंद्र आहिरे ह्यांनी एक अप्रतिम कलाकृती दिली आहे.

एक लाकडी खेळणं जिला 'ख्वाईश' पुरी करणारी वस्तू म्हणून चित्रपटात दाखवलं आहे त्याचं महत्त्वसुद्धा चित्रपटात बघण्यासारखं आहे. सिनेमातली गाणी सुंदर आहेत. म्युझिक खूप गोड आहे. चित्रपट सांगण्याची पद्धत खूप आवडली. अगदी चित्रपट संपल्यावर,– पत्र लिहून झाल्यावर लिहितात तसं, आपला विश्वासू 'गजेंद्र अहिरे' असं लिहिणं देखील भावलं.

हा चित्रपट सर्वांगसुंदर वाटला. ज्यांना बघायची इच्छा आहे त्यांना तो अमेझॉन प्राईमवर बघता येईल.

**– प्रा. श्रीपाद जोशी**
प्रसिद्ध गीतकार
मुंबई

•••

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**जोशी बेडेकर महाविद्यालयात ऑनलाईन पद्धतीने साजरा झाला शिक्षक दिन!**

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाने दुपारी झूम या ऑनलाइन व्यासपीठाद्वारे शिक्षक दिन साजरा केला.

कार्यक्रमासाठी पाहण्या म्हणून उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रारंभी, एचओडी प्रमोद खराटे यांनी सर्वांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे आभार मानले.

या शुभ प्रसंगी एसवाय इंग्रजीच्या ध्रुव आणि सुश्री ज्युलियन या विद्यार्थ्यांनी जपानी व इंग्रजी भाषांमध्ये भाषणे केली. तसेच हिमाश्री या विद्यार्थिनीने तिची कविता सादर केली. तसेच टीवायबीए इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी विभागातील शिक्षकांवर दहा मिनिटांचा व्हिडिओ सादर केला ज्यामध्ये त्यांनी भाषण, गाणे आणि संगीत यांद्वारे शिक्षकांवरील त्यांच्याबद्दलचा आदर आणि प्रेम व्यक्त केलं.

जोशी बेडेकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, 'अबूधाबी, युएई मधील शिक्षणतज्ज्ञ, लेखक सुश्री रुखसार सय्यद' यांनाही आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी भाषण दिले.

विभागातील सर्व शिक्षकांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी प्रेरणादायी भाषण केले आणि इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक केले.

हा संपूर्ण कार्यक्रम इंग्रजी विभागाच्या टीवायच्या विद्यार्थ्यांनी आखला होता. अनुष्का बारसे आणि सायली सिन्नरकर या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे संचालन केले होते. कार्यक्रमाची सांगता अनुष्का हिने आभार मानून केली.

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेच्या पंचविसाव्या रौप्य महोत्सवानिमित्त ७ सप्टेंबर २०२० रोजी ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश बाबा आमटे आणि डॉ. मंदाकिनी प्रकाश आमटे यांची प्रकट मुलाखत**




जोशी–बेडेकर महाविद्यालयाच्या वतीने डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेच्या पंचविसाव्या रौप्य महोत्सवानिमित्त ७ सप्टेंबर २०२० रोजी ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश बाबा आमटे आणि डॉ. मंदाकिनी प्रकाश आमटे यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही व्याख्यानमाला अविरत सुरू असून आजपर्यंत या व्याख्यानमालेत ज्येष्ठ संस्कृत पंडित प्रभाकर आपटे, तत्त्वज्ञ शुभदा जोशी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु दीपक टिळक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा मिश्रा, पद्मश्री भरत वाटवाणी, पद्मश्री सीड मदर राहीबाई पोपेरे, ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. वामन केंद्रे इत्यादी मान्यवरांनी विचार मांडले.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लोकशाहीच्या

सबलीकरणासाठी सामाजिक कार्याची डोळसपणे विद्यार्थी जीवनात असलेली गरज अधोरेखित केली. विवेकानंदांच्या विचारांना उजाळा देत डॉ. सुचित्रा नाईक यांनी सामाजिक प्रश्नांकडे तरुणाईचे लक्ष वेधले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले. तसेच त्यांनी डॉ. प्रकाश आमटे यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला.

डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या हेमलकसा येथील कामाची माहिती देण्यासाठी एक माहितीपट सुरुवातीला दाखवण्यात आला.

हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्पाला मूर्त स्वरूप देणारे डॉ प्रकाश आमटे व त्यांना तन-मन-धनाने साथ देणाऱ्या त्यांच्या सहचारिणी डॉ मंदाकिनी आमटे यांची मुलाखत जोशी-बेडेकर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. मृण्मयी थत्ते व डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी घेतली. या मुलाखतीच्या माध्यमातून आमटे दाम्पत्याने आदिवासी क्षेत्रात लोकबिरादरी प्रकल्पाच्या निमित्ताने केलेल्या बहुआयामी कार्याचे पदर उलगडण्यात आले.

याप्रसंगी डॉ. प्रकाश आमटे म्हणाले की, या सामाजिक कामाचं बाळकडू त्यांचे वडील ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या रूपानं त्यांना घरात मिळालं. वडिलांचा समाजसेवेचा वसा अत्यंत डोळसपणे व समर्थपणे चालविण्याचे त्यांनी खुप लवकर ठरवले होते. गडचिरोली जवळील हेमलकसा येथे माडिया गोंड या आदिवासी जमातीचा सर्वांगिण विकास करण्याचे त्यांनी ठरवले. आदिवासी लोकांमध्ये काम करताना त्यांना जीवनात आमूलाग्र बदल करावे लागले व येईल त्या प्रत्येक संकटाला तोंड देत समाजसेवेचे व्रत पुढे न्यावं लागलं. 'या कामातून आम्हीदेखील घडलो' असे यावेळी डॉ. प्रकाश आमटे म्हणाले. वाघ, सिंह, चितळ सुसर, अस्वल इत्यादी अनेक हिंस्र श्वापदं अत्यंत प्रेमाने त्यांच्यासोबत घरातील कुटुंबीयां सारखी नांदतात ही बाब अधोरेखित करत संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटल्याप्रमाणे, 'भूतां परस्परे जडो । प्राणिजात।।' ही संकल्पना त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती.

सुरुवातीला आदिवासी क्षेत्रात काम करायला आलेल्या आमटे दाम्पत्यांनी शेतीमध्ये देखील अभिनव प्रयोग केले. वन्यजीवांसाठी आसरा सुरू केला. १९७४ पासून 'लोक बिरादरी प्रकल्पा'त आरोग्य, शिक्षण, कृषी व एकात्मिक विकासाच्या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय काम केलं आहे. त्यांच्या या कामाची दखल घेत २००८ साली रॅमन मॅगसेसे पुरस्कार व २००२ साली भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार मिळाला. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी मोनॅको या देशाने आमटे दाम्पत्यावर पोस्टल स्टॅम्प देखील प्रकाशित केला आहे.

आमटे दाम्पत्याच्या जीवनावर चित्रित झालेल्या व प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर आणि सोनाली कुलकर्णी यांच्या अभिनयाने अजरामर झालेला मराठीतील 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' या चित्रपटाबद्दल बोलताना ते म्हणाले की, 'या चित्रपटामुळे मला सर्वदूर ओळख मिळाली. अनेक विद्यार्थी व कार्यकर्ते स्वतःहून समाजकार्यात काम करण्यासाठी पुढे येऊ लागले'. याप्रसंगी डॉ. मंदाकिनी आमटे यांनी सुरुवातीच्या त्यांच्या संघर्षाबद्दल बोलताना म्हटलं की, 'आदिवासी बोलताना भाषेची अडचण येत होती. ती अडचण आम्ही त्यांची भाषा शिकून दूर केली. सुरुवातीला आदिवासींचा आमच्यावर विश्वास बसत नव्हता. नंतर आमच्या कामाकडे पाहून त्यांचा हळूहळू विश्वास बसू लागला व त्यातूनच त्यांच्या आरोग्याच्या समस्यांकडे आम्हाला लक्ष देता आलं. याचाच परिपाक म्हणून इथे आदिवासींच्या मुलांना शिकवण्यासाठी आम्ही शाळा निर्माण केली व त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होताना आम्ही पाहू शकलो. निःस्वार्थी भावनेने सेवा करणे हे आपलं काम आहे. शेवटी जनता जनार्दन हाच परमेश्वर असतो याची

जाणीव पुढच्या पिढीने व विद्यार्थी वर्गाने मनात ठेवली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. 'आपल्या सभोवताली घडत असलेल्या सामाजिक बदलांकडे डोळस दृष्टी ठेवून सामाजिक बदल घडवून आणण्यात आपला वाटा वाढवला पाहिजे' असा विचार त्यांनी मांडला.

'आदिवासींची लोकसंख्या भारतात आज एकूण दहा कोटी आहे. त्यांचा विकास झाल्याखेरीज भारताचा सर्वांगीण विकास झाला असे म्हणता येणार नाही' असे मत आमटे दाम्पत्यांनी मांडले.

यावेळी संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही मुलाखत फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून सर्वांना उपलब्ध करण्यात आली. जवळपास चार हजार विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या संयोजनाची जबाबदारी डॉ. महेश पाटील यांनी सांभाळली तर दिवेश बापट यांनी तांत्रिक सहाय्य केले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन



पारंपरिक पद्धतीने वादन चालवण्यासाठी पेट्रोल, डिझेल या जीवाश्म इंधनांचा वापर केला जातो. पण त्याचा साठा अल्प असल्यामुळे इतर नवीन पद्धतीचा इंधन म्हणून वापर करण्यासाठी सर्वत्र प्रयत्न चालले आहेत. व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकच्या इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीमच्या विभागातील वरिष्ठ प्राध्यापिका सौ. राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाने ''इलेक्ट्रीकल व्हेईकल चार्जिंग स्टेशन'' या प्रकल्पावर जयसिंग पवार, अमृत भोकरे, गणेश निरगुडे, गणपेरा तायडे, सूरज जाधव, अमोल भोकरे या विद्यार्थ्यांनी काम केले.

प्रस्तुत प्रकल्पात इलेक्ट्रॉनिक कम्पोनंटस्‌चा वापर करण्यात आला. त्यात १४.६ व्होल्ट देणाऱ्या ''लिथिअम-आयन बॅटरी'' चा वापर करण्यात आला. त्यामुळे जलदगतीने चार्जिंग केले जाते व चार्जिंगचा कालावधी कमी लागतो. त्यामुळे भविष्यात इलेक्ट्रीक वाहनांसाठी हे वरदान ठरणार आहे. जीवाश्म इंधनाच्या ऐवजी चार्जिंग सिस्टीमचा वापर केला जाईला. प्रस्तुत प्रकल्पाला अनेक पारितोषिकं मिळाली आहेत. राज्यस्तरावर हा प्रकल्प स्पर्धेत उतरला आहे. MHRD च्या Innovation cell च्या Innovation idea स्पर्धेत द्वितीय फेरीत पोहोचला आहे. MSBTE च्या राज्यस्तरीय स्पर्धेत प्रकल्प सहभागी झाला आहे. आता हा प्रकल्प 'ब्राझीलमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत' सहभागी होणार आहे.

## डॉ. डी. के. नायक यांच्या 'Inspiring Life' या पुस्तकाचे प्रकाशन



**'Inspiring Life' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. विजय बेडेकर व इतर मान्यवर**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांच्या 'Inspiring Life' या पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवार दि. ११ सप्टेंबर २०२० रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी विप्रमंच्या सलग्न संस्थाचे प्राचार्य, संचालक व इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ. नायक यांनी आजपर्यंतचा आपला जीवन प्रवास या पुस्तकाच्या माध्यमातून उलगडला आहे. हे पुस्तक किती वाचनीय व प्रेरणादायी आहे हे मान्यवरांनी

दिलेल्या अभिप्रायावरून लक्षात येते. डॉ. नायक यांच्या जीवनावरील 'Inspiring Life' हे आत्मचरित्र वाचकांसाठी अनमोल ठेवा आहे.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**ऑगस्ट – २०२० मधील कार्यक्रम / वार्ता**

१२ ऑगस्टः जी एच आर डी सी सी एस आर तर्फे बी–स्कूल सर्व्हे २०२०साठी आभासी भेटी द्वारे; औद्योगिक संबंध, एमडीपी, संशोधन आणि प्लेसमेंट यासारख्या विविध मापदंडांविषयी विषयी आभासी डेटा प्रमाणीकरण केले गेले. डॉ. नीतिन जोशी, डॉ. स्मिता जपे, डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा, डॉ. पल्लवी चांदवसकर, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. महेश भानुशाली आणि प्रा. दीप्ती पेरिवाल या आभासी भेटीसाठी उपस्थित होते.

१४ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांना व्हीपीएमच्या प्रगत अभ्यास केंद्राने एका कार्यक्रमासाठी पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते.

१५ ऑगस्ट : डीएच विद्यार्थ्यांचे अभिमुखता सत्र यशस्वीरित्या आयोजित केले. डीएचएल स्मार्ट ट्रकिंगच्या दोन वरिष्ठ मानव संसाधन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डीएचएल स्मार्ट ट्रकिंगद्वारे खालील पाच विद्यार्थ्यांची ऑनलाईन इंटर्नशिपसाठी निवड केली गेली आहे.

१) प्रियंका शिंदे २) अनिकेत बक्कर ३) सुरक्षा धाणे ४) सिद्धार्थ भुर्के ५) श्वेता चव्हाण

२० ऑगस्ट : आयएमसी रामकृष्ण बजाज राष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कार (आयएमसी आरबीएनक्यूए) निकषानुसार प्रोफेसर विभुती सावे यांनी एक्सलन्स इन क्रायसिस या स्पर्धेसाठी ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल अहमदाबाद कॅम्पसच्या अर्जाचे मूल्यांकन केले.

२४ ऑगस्ट : डॉ. स्मिता जपे यांचा बँक कन्सोलिडेशन: प्री अँड पोस्ट मर्जर फिनान्सियल परफॉर्मन्स ऑफ स्टेट बँक ऑफ इंडिया या विषयावरील शोध निबंध इंटरनॅशनल जर्नल ऑफ मॅनेजमेंट, आयटी अँड इंजिनिअरिंग (आयजेएमआयई) आयएसएसएन : २२४९–०५५८ नियतकालिकामध्ये प्रकाशित झाला.

३० ऑगस्ट : डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा, प्रा. महेश भानुशाली आणि प्रा. विभुती सावे यांनी ऑनलाईन सप्लाय चेन मॉड्यूलर कोर्सच्या पहिल्या तुकडीचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

३१ ऑगस्ट : प्रा. महेश भानुशाली यांनी ऑगस्ट २०२० मध्ये कॅम्पस प्लेसमेंटच्या पुढील संधी उपलब्ध करून दिल्या. निकाल प्रतीक्षेत आहे.

| संस्थेचे नाव | शाखा | वार्षिक वेतन | मुलाखत घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| टीजेएसबी बँक | वित्त व विपणन | ४ लाख | २० |
| डीएचएल ग्लोबल सप्लाय चेन | प्रचलन आणि मानव संसाधन | ३.५ लाख | १५ |
| पुराणिक बिल्डर्स | विपणन | ६ लाख | १८ |

डॉ. नीतिन जोशी यांनी एमएमएस; मानव संसाधन शाखेच्या जय नांगरे, सोबेल चोरडेकर आणि श्रमिका घागरे या तीन विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय प्रकल्पांची व्यवस्था केली. हे विद्यार्थी फर्स्ट वेव्ह रिसर्चने दिलेल्या प्रकल्पासाठी प्रा. कंचन अक्षय यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहेत. त्यांना भारत, मध्य पूर्व आणि आफ्रिका खंडातील देशांसाठी ऑनलाईन ट्रेनिंग प्लॅटफॉर्म आणि बाजारपेठ शोधण्याचे काम / उद्दिष्ट देण्यात

आले आहे. हा एक महिन्याचा प्रकल्प आहे ज्यास प्रति विद्यार्थी १२ हजार इतकी छात्रवृत्ती मिळणार आहे.

डॉ. नीतिन जोशी यांची स्कोपस अनुक्रमित इंटरनेशनल जर्नल ऑफ बिझिनेस इनोव्हेशन अँड रिसर्च या नियतकालिकाचे समीक्षक म्हणून नेमणूक झाली.

डॉ. नीतिन जोशी यांचे ''मुंबईतील सार्वजनिक आणि खाजगी जीवन विमा कंपन्यांमधील सेवा गुणवत्तेविषयी ग्राहकांच्या समजुतीचा अभ्यास'' या विषयावरील शोध निबंध; आयएसएन २२२९-३६२० असलेल्या युजीसीच्या सूचीबद्ध नियतकालिकात प्रकाशित झाला.

प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी गुणवत्तापूर्ण संशोधन या विषया संबंधित दोन व्हिडिओ तयार केले.

प्रा. कृणाल के. पुंजानी, डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. महेश भानुशाली, प्रा. विभुती सावे आणि प्रा. संदीप मोघे – या ब्रीम्सच्या आयआयसी समितीने 'इनोबिझ' – इनोव्हेशन स्पर्धा (ऑगस्ट) चे संयोजन केले. सोल्यूशन नोट्स मिळविण्यासाठी आणि सर्व संघांचे मूल्यांकन करण्यासाठी वरिष्ठ परीक्षकांशी समन्वय साधला.

ब्रीम्सचे प्राध्यापक खालील वेबिनार किंवा अभ्यासक्रमांना उपस्थित राहिले.

| Faculty | FDP / Workshop | Date |
|---|---|---|
| Dr. Nitin Joshi | Entrepreneurship for carrier development | 13th August |
| Dr. Smita Jape | Online workshop organised byAICTE on topic "Incorporating Universal Human Values in Education" | 19th to 23th August |
| | Faculty learning programme organised by Business Standard | 22nd August |
| Prof. Krunal K.Punjani | 2 Certificate Modules on "How to promote your research for maximum impact" and "Plagiarism" from the Elsevier Research Academy | 2nd to 3rd August |
| | Developing Research Questions by Dr.Murugan, University of Hyderabad | 16th August |
| | Mediation & Moderation analysis, organized by University of Hyderabad. | 25th to 26th August |
| | "Application of Mendeley on Research" organized by Institute of Policy Research in Economics, Management and Social Development | 30th- 31st August |
| Dr. Arloph John Vieira | Essential Education for Accelerating Creative Career | 06-08-2020 |
| | Using AI to Accelerate Time-to-Market and improve market quality | 18-08-2020 |
| | "True Value of Blockchain in Supply Chain: Data and Finance" | 28-08-2020 |

●●●

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

शिक्षणाकडे ज्या विवेकी दृष्टीने पाहिले त्या डोळसपणातून करोनोत्तर शिक्षणाचा नवा प्रवाह येईल असे वाटते.

करोना लॉकडाऊनच्या काळात, 'शिक्षण हे अत्यावश्यक सेवांमध्ये मोडत नाही' हे वास्तव समोर आले! हे खूप दुर्दैवी आहे. 'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना शिक्षण क्षेत्रात अजून म्हणावी तेवढी रुजली नाही. हे होण्याचे कारण म्हणजे भारतात अध्ययन व अध्यापनाचा परंपरागत दृष्टिकोन. शिक्षकांनी निर्धारित विषय व अभ्यासक्रम परीक्षेच्या दृष्टिकोनातून शिकवावा ही अपेक्षा विद्यार्थी व एकूणच व्यवस्थेची असते. त्यामुळे वर्षानुवर्षे तोच तो अभ्यासक्रम (काही सुविद्य अपवाद वगळता) रटाळ पद्धतीने 'संपवला' जातो. असं दिसतं की, विद्यार्थ्यांना परीक्षेचा कंटाळा आला आहे. परीक्षा घेण्याच्या पद्धतीचा किंवा एकूणच परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या रटाळ प्रश्नांचा उबग आला असावा असे वाटते.

मात्र लॉकडाऊनच्या काळात विद्यार्थी घरीच बसून इतके वेगवेगळे उपक्रम करत आहेत. शिक्षकांना सुद्धा झूम, गुगल मीट, व्हिडीओ कॉल या माध्यमातून लेक्चर घेताना वेगळाच फील येतोय. उच्च शिक्षणातल्या रेट्यामुळे का होईना वेबिनार, एफ डी पी चे सेशन्स प्राध्यापक करत आहेत. यामागे करोनोत्तर जगात डिजिटल कौशल्य अद्ययावत असण्याची अपरिहार्यता आहे. आपण स्पर्धेत मागे पडू ही भीती आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर उच्च शिक्षणात पुढील प्रमाणे बदल होतील असे वाटते -

करोनोत्तर अभ्यासक्रम तयार करताना त्याची उद्देशिका (Mission Statement) ही संपूर्णपणे वेगळी असेल. शिक्षण हे थेरोटीकल शिकवण्यापेक्षा डिजिटल मॉड्यूल्स तयार करून व ई-रिसोर्स देऊन बनवावे लागेल. या निमित्ताने इंग्रजी भाषेच्या पठण-पाठण पद्धतीचे उदाहरण देता येईल. इंग्रजी संभाषण क्षमता आत्मसात करण्यासाठी सद्य प्रचलित अभ्यासक्रमात थेरोटीकल गोष्टींचा भरणा जास्त आहे. मात्र भाषा अवगत करण्यासाठी त्या भाषेतील गोष्टींचे श्रवण Listening skills कडे दुर्लक्ष होते. या उलट रोज २० मिनिटे इंग्रजीतील टेड स्पिचेस ही वर्गात मोठ्या आवाजात ऐकवली तर विद्यार्थी एका महिन्याच्या आत इंग्रजी बोलतात. आपण भाषेबद्दल शिकवतो, भाषा शिकवत नाही. व्याकरण शिकवण्यापेक्षा त्या भाषेतील उच्चदर्जाचे साहित्य शिकवण्याच्या अनुभवातून भाषा शिकता येते.

करोना लॉकडाऊन मध्ये सर्व क्षेत्र ठप्प आहेत. मात्र डिजिटल व आय टी क्षेत्र हे मोठ्या (ऐटीत) तेजीत आहेत. आजसुद्धा ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर एडीएक्स, कोर्सेरा इत्यादी संकेतस्थळांनी करोना लॉकडाऊन स्पेशल कोर्सेस अत्यल्प पैशात सुरू केले आहेत. अभियांत्रिकी, विधी, विज्ञान, साहित्य, भाषा अशा अनंत विषयांवर कमीत कमी १ दिवस ते ४ आठवडे या कालावधीत संपणारे अभिनव अभ्यासक्रम एमआयटी व हार्वर्ड या अमेरिकेतील लब्धप्रतिष्ठित विद्यापीठांनी Edx.org या प्लॅटफॉर्मवर सुरू केले आहेत. कुठल्याही अभ्यासक्रमाला कमीत कमी १ हजार ते ३० हजार विद्यार्थी नाव नोंदवतात. त्यातही दोन प्रकार आहेत. तुम्ही तो कोर्स विनामूल्य पूर्ण करू शकता किंवा अगदी ५० ते १०० डॉलर मध्ये कोर्सचे त्या विद्यापीठाचे सर्टिफिकेट मिळवू शिकता. उदाहरणार्थ मी edx.org या प्लॅटफॉर्मवर William Shakespeare: Life and Works हा हार्वर्ड विद्यापीठाचा ४ आठवड्याचा कोर्स करत आहे. या कोर्सला नाव नोंदवणारा मी २०,३४५ वा विद्यार्थी आहे. मला सर्टिफिकेटसाठी फक्त ४९ डॉलर अर्थात ३७८० रुपये भरावे लागले.

मुख्य म्हणजे मला हार्वर्डचे सर्टिफिकेट मिळणार व तेही भारतात बसून! सोबत वरील विषय शिकवणारा स्टीफन ग्रीनब्लाट हा अमेरिकेतील शेक्सपिअर या विषयावरचा ख्यातकीर्त अभ्यासक आहे.

नुकत्याच सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल आपल्यासमोर आहे. या निकालाच्या माध्यमातून राज्य सरकारांना अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. जवळपास मागील चार महिने विद्यार्थी हे परीक्षा होणार की नाही या संभ्रमात होते. त्यावर अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची मोहर लागली. विद्यापीठ पातळीवर परीक्षा आभासी माध्यमातून घेण्याची वर्दळ सध्या सुरू आहे. बहुपर्यायी प्रश्नांच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका तयार करून परीक्षा घ्यावी असा एकूणच सूर दिसतो. यामध्ये आधीच मागचे चार महिने निर्णय प्रक्रिया लांबल्यामुळे विद्यार्थ्यांचे निकाल झटपट लावता यावे हा हेतू देखील दिसतो. मात्र साहित्य, तत्त्वज्ञान, पत्रकारिता, तसेच अन्य मानव्यविद्या शाखांमध्ये बहुपर्यायी प्रश्न देऊन परीक्षा घेणे कितपत योग्य आहे हा देखील शिक्षण तज्ज्ञांच्या मनातला प्रश्न या निमित्ताने पुढे येत आहे. या परिप्रेक्षात बदलत्या परीक्षा पद्धतीचे नव्याने आकलन करणे आवश्यक वाटते. परीक्षा घेण्यासाठी इंटरनेटवर वेगवेगळ्या वेबसाईटस् उपलब्ध आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना गुगल क्लासरूमच्या माध्यमातून वेगवेगळे प्रकल्प करण्यासाठी उद्युक्त करता येऊ शकते. तसेच, त्यांचे मूल्यांकन देखील आभासी माध्यमातूनच करता येते.

परीक्षा पद्धतीत सकारात्मक बदल करावे लागतील. उदाहरणार्थ edx.org या प्लॅटफॉर्मवर परीक्षा ही अभिनव पद्धतीने घेण्यात येते. ऑनलाइन डॅशबोर्ड तयार करून अभ्यासक्रमाला नाव नोंदवलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन चर्चा एकत्रपणे करता येते. कल्पक प्रकल्प (असाईनमेंट) देऊन त्याचे मूल्यमापन प्रथम आपले सहाध्यायी करतात (Peer evaluation). या डॅशबोर्डवर शिक्षक वेळप्रसंगी आशयाचे नियमन करतो व ग्रेडिंग करतो. शिक्षकाने दिलेल्या व्हडिओ लेक्चरवर आधारित ३०० वा ५०० शब्दांत उत्तर लिहिण्यासाठी असाईनमेंट दिली जाते. कोर्स समाधानकारकरित्या पार पडल्यास प्रमाणपत्र मिळते. सध्या भारतात लॉकडाऊनच्या काळात वेबिनारचे पीक आले आहे. एरव्ही जे वर्गात जाऊन बोलणार असतो ते आपल्या गॅलरीत बसून बोलणे म्हणजे वेबिनार नाही. अध्यापनाचा आशय डिजिटली बदलत नाही तोपर्यंत ते व्याख्यान रोचक होत नाही.

करोनोत्तर काळात परदेशात शिकायला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओढा कमी होईल असे वाटते. आर्थिक अडचण हे देखील त्यामागील एक कारण असू शकेल. असे अभ्यासक्रम अधिक प्रमाणात सुरू करावयास हवे की ज्यामध्ये काही वर्षे भारतातच डिजिटल माध्यमातून परदेशातील अभ्यासक्रम करता येईल व केवळ शेवटचे संपूर्ण सेमिस्टर विद्यार्थी परदेशात जातील व भारतात परत येऊन स्टार्टप सुरू करतील. असं झाल्यास उच्च शिक्षित मनुष्यबळास भारतात परत आकर्षित करण्यात येईल. ब्रेनड्रेन थांबेल.

हुशार मुलांना भारतातच सामावून घेण्यासाठी आपल्याला शिक्षण क्षेत्रात डिजिटल क्रांती घडवून आणावी लागेल. केवळ फेसबुक, इन्स्टाग्राम व व्हॉट्सप वापरता आलं म्हणजे डिजिटल होता आलं असं नाही. शिक्षणक्षेत्रात अध्ययन, अध्यापन, अभिनव अभ्यासक्रम निर्मिती, कार्यानुभवाधारीत शिक्षण, केवळ प्रमाणपत्र वा गुणपत्रिका न देता; ज्ञान व कौशल्य वृद्धिंगत करणारे शिक्षण निर्माण करावे लागेल. चित्रपटाचे ट्रेलर पाहून जसा आपण चित्रपट पाहतो, तसेच एखाद्या अभ्यासक्रमाचे ब्रँडिंग हे त्यातून अवगत होणाऱ्या कौशल्यावर आधारित असावे लागेल.

हार्वर्डच्या व ऑक्सफर्डच्या धर्तीवर आपल्यालाही चांगले कोर्सेस निर्माण करावे लागतील. अध्यापनाचा आशय व तो आशय विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याची पद्धत आमुलाग्र बदलेल.

प्रादेशिक भाषांमध्ये आशय निर्मितीची प्रचंड गरज जाणवेल. आपणा सर्वांना माहीत आहे की, जपान सारख्या छोट्या देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, भाषा, साहित्य इत्यादी सर्व विषयांवर जपानी भाषेमध्ये ग्रंथ व आशय निर्मिती केल्यामुळे त्यांना इंग्रजीच्या माध्यमांची गरज पडत नाही. सर्व आवश्यक मजकूर हा जपानी भाषेत डिजिटल स्वरूपात उपलब्ध असतो. जपानची महाराष्ट्राशी तुलना केली असता आपणास हे जाणवेल की, जवळपास बारा कोटी लोकसंख्या असलेल्या या महाराष्ट्राच्या मानाने मराठीमध्ये डिजिटल स्वरूपात जशी आशय निर्मिती (content creation) म्हणावी तेवढी झालेली दिसत नाही. विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी विषयांवर मराठी भाषेत जोपर्यंत दर्जेदार व सोप्या पद्धतीने ग्रंथलेखन होणार नाही तोपर्यंत त्या भाषेकडे पुढच्या पिढीचा ओढा राहणार नाही. अर्थात हे काम शासन वेगवेगळ्या शैक्षणिक संस्था व विद्यार्थी, तसेच नागरिक यांनी एकत्र येऊन करावयाचे आहे. उदाहरणार्थ, भारतीय भाषा शिकवण्यासाठी यूट्युबवर असंख्य चॅनल्स आहेत. अनेक गोष्टी प्रादेशिक भाषेत उपलब्ध करून देण्याची गरज डिजिटल क्रांतीने निर्माण केली आहे. मराठी, हिंदी, तसेच अन्य प्रादेशिक या भाषांमध्ये डिजिटल व्यवहार करणाऱ्यांची संख्या लक्षणीय असून त्यांच्यासाठी प्रादेशिक भाषेत आशयनिर्मिती करावी लागेल.

शिक्षणातील डिजिटल क्रांतीसाठी शिक्षक व प्राध्यापकांना प्रशिक्षित करावे लागेल. आज प्रत्येकाला मोबाईल लॅपटॉपच्या माध्यमातून झूम किंवा गुगल मीटच्या माध्यमातून आभासी माध्यम घ्यावे लागत असल्यामुळे त्याची तीव्रता जास्त जाणवत आहे. 'जे स्वतःला अद्ययावत ठेवतील, शिक्षणातील नवे प्रवाह समजून घेतील, तेच स्पर्धेत टिकतील', हे विधान दरवेळी केले जाते. मात्र करोनोत्तर काळात हे प्रकर्षाने जाणवेल. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) व मशीन लर्निंग हे सध्या परवलीचे शब्द आहेत. याचा अध्यापनात वापर करावा लागेल.

शिक्षक व प्राध्यापक यांची निवड करताना पात्रतेचे निकष बदलतील. संबंधित विषयाचे ज्ञान व अध्यापन कौशल्य या सोबत ती व्यक्ती आधुनिक तंत्रज्ञानाशी (टेक्नॉसॅव्ही) असावी असा निकष ठरेल. म्हणजे वर्गावर जाऊन शिकवण्यापेक्षा डिजिटल टूल्स वापरून लेक्चर घेण्यासोबत त्याला आशय निर्मिती कल्पकतेने करता यायला हवी. शिक्षक प्रशिक्षण देताना इथून पुढे कोरोनाने शिकवलेल्या अनेक धड्यांमध्ये ऑनलाइन शिक्षण हा एक महत्त्वाचा धडा आपल्याला घेता येईल

युवल नोवा हरारी या प्रख्यात लेखकाच्या गतवर्षी प्रकाशित झालेल्या Twenty Lessons for 21st Century या पुस्तकात तो म्हणतो "to stay relevant, you will need the ability to constantly learn and to reinvent yourself ". करोनोत्तर काळात शिक्षण क्षेत्राला आमुलाग्र बदल घडवून कात टाकण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली आहे. भारत या क्षेत्रात जे बदल घडवून आणेल ते बदल पुढचे सहस्रक घडविण्यास उपयुक्त ठरेल!

**– डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.